# महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाच्या ६९व्या सभेचे इतिवृत्त

# महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ.

## दिनांक 28 ऑगस्ट, 1996 (बुधवार) रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या 69 व्या बैठकीचे इतिवृत्त.

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाची 69 वी सभा शुक्रवार दि. 28.8.1996 रोजी सकाळी 11 वाजता मंडळाचे अध्यक्ष तथा मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे अध्यक्षतेखाली मंडळाचे सदस्य सचिव यांचे दालनांत एक्सप्रेस टॉवर्स, 4 था मजला, मुंबई–21 येथे संपन्न झाली. सदरहू सभेस मंडळाचे खालील सदस्य उपस्थित होते.

1. मा.ना.श्री.अण्णासाहेब डांगे,
   अध्यक्ष, म.पा.पु. व ज.नि.मंडळ व मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.

2. मा.श्री.रवींद्र माने,
   उपाध्यक्ष, म.पा.पु. व ज.नि.मंडळ व राज्यमंत्री, नगर विकास तथा पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.

3. श्री.व्ही.रंगनाथन,
   सदस्य, म.पा.पु. व ज.नि.मंडळ व
   प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.

4. श्री.नानासाहेब पाटील,
   सदस्य,म.पा.पु. व ज.नि.मंडळ व सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग.

5. श्रीमती, रंजना सिन्हा,
   सदस्य, म.पा.पु. व ज.नि.मंडळ व प्रधान सचिव, वित्त विभाग यांच्या प्रतिनिधी.

6. श्री.राजेंद्र सगणे,
   सदस्य सचिव, म.पा.पु. व ज.नि.मंडळ.

मंडळाच्या सभेस उपस्थित राहू न शकलेल्या सदस्यांच्या रजेस मंजूरी देण्यांत आली.

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाचे खालील अधिकारी विशेष निमंत्रीत म्हणून उपस्थित होते.

1) श्री.शे.दौ.अरमाळ, मुख्य अभियंता (प्रकल्प)
2) श्री.वि.के.भसाळे, मुख्य अभियंता (नागरी)
3) श्री.सं.वि.शेळकीकर, मुख्य अभियंता (ग्रामीण)
4) श्री.सु.का.पाटील, मुख्य अभियंता (जागतिक बँक)
5) श्री.ज.बा.आंबेगावकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी.
6) श्री.भा.आ.डोंगरे, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी.

3

# महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळ

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स
नरीमन पॉइन्ट,
मुंबई-४०० ०२१.
दूरध्वनी : (०२२) २०२ ५३ ५४
२०२ ६२ ४९, २८३ ५२ ४७.

तार : पाणी मंडळ
फॅक्स : (९१) ०२२-२०२ ९३ ४८

क्र.सभा/मुप्रअ/(69)/आ–4.

दिनांक : 5 ऑक्टोबर, 1996.

प्रति,

मा.ना.श्री.अण्णासाहेब डांगे,
अध्यक्ष, म.पा.पु. व ज.नि.मंडळ
व मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
मंत्रालय, मुंबई–32.

मा.ना.श्री.रविंद्र माने,
उपाध्यक्ष, म.पा.पु. व ज.नि.मंडळ
व राज्यमंत्री, नगर विकास, पा.पु. व स्व.विभाग,
मंत्रालय, मुंबई–32.

श्री.व्ही.रंगनाथन,
सदस्य, म.पा.पु. व ज.नि.मंडळ
व प्रधान सचिव, पा.पु.. व स्व..विभाग,
मंत्रालय, मुंबई.

श्री.के.नलिनाक्षन,
सदस्य, म.पा.पु. व ज.नि.मंडळ
व प्रधान सचिव, नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई.

श्री..नानासाहेब पाटील,
सदस्य, म..पा.पु. व ज.नि.मंडळ व
सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई.

(4)

श्री.व्यंकटचारी,
सदस्य, म.पा.पु. व ज.नि.मंडळ व
प्रधान सचिव, वित्त विभाग,
मंत्रालय, मुंबई.

श्री.विनय बन्सल,
सदस्य, म.पा.पु. व ज.नि.मंडळ व
सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई.

श्री.रामानंद तिवारी,
सदस्य, म.पा.पु. व ज.नि.मंडळ व
सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,
मंत्रालय, मुंबई.

श्री.राजेंद्र सगणे,
सदस्य सचिव,
म.पा.पु. व ज.नि.मंडळ,
एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.

विषय : दिनांक 28.8.96 रोजी झालेल्या मंडळाच्या 69 व्या सभेचे इतिवृत्त.

महोदय,

दिनांक 28.8.96 रोजी झालेल्या मंडळाच्या 69 व्या सभेचे इतिवृत्त सोबत पाठविण्यांत येत आहे.

वरील इतिवृत्ताबाबत आपले काही अभिप्राय असल्यास ते या कार्यालयास कृपया त्वरीत पाठवावे म्हणजे ते मंडळाच्या पुढील सभेत विचारासाठी ठेवण्यांत येतील.

आपला विश्वासू,

(ज.बा.आंबेगावकर)
मुख्य प्रशासकीय अधिकारी.

सोबत : इतिवृत्त पृ.क्र.1 ते 48

(2)

(5)

इतिवृत्त सविनय अवलोकनार्थ सादर.

श्रीमती रंजना सिन्हा, सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

श्री.एस..डी.अरमाळ, मुख्य अभियंता (प्रकल्प), म.पा.पु. व ज.नि.मंडळ, मुंबई.

श्री.डी..के.भसाळे, मुख्य अभियंता (नागरी), म.पा.पु. व ज.नि.मंडळ, मुंबई.

श्री.एस.व्ही.शेळकीकर, मुख्य अभियंता (ग्रामीण), म.पा.पु. व ज.नि.मंडळ, मुंबई.

श्री.एस.के.पाटील, मुख्य अभियंता (जागतिक बँक), म.पा.पु. व ज.नि.मंडळ, ठाणे.

श्री.ज.बा.आंबेगावकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.पा.पु. व ज.नि.मंडळ, मुंबई.

श्री.भा.आ.डोंगरे, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, म.पा.पु. व ज.नि.मंडळ, नवी मुंबई.

प्रत माहितीसाठी.

अधीक्षक अभियंता, मुख्यालय/म.नि.सं.व सं.कक्ष.म.पा.पु. व ज.नि.मंडळ, मुंबई--1.

उप मुख्य लेखाधिकारी (1), म.पा.पु. व ज.नि.मंडळ, नवी मुंबई.

आस्थापना अधिकारी (दक्षता), म.पा.पु. व ज.नि.मंडळ, मुंबई..

जनसंपर्क अधिकारी, म.पा.पु. व ज.नि.मंडळ, मुंबई.

प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी, म.पा.पु. व ज.नि.मंडळ, नवी मुंबई.

कार्यासन अधिकारी आ–1/3/4/7/10.

meeting/

मंडळाचे सदस्य सचिव श्री.राजेंद्र सगणे यांनी प्रथम मा.श्री.अण्णासाहेब डांगे, अध्यक्ष, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ व श्री.रवींद्र माने, उपाध्यक्ष, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ यांना सर्व सदस्यांची ओळख करुन दिली व सर्व उपस्थितांचे स्वागत केले. नंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

<u>**कार्यक्रम बाब क्र.1**</u> :– 68 व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.

मंडळाने प्रसृत केलेल्या इतिवृत्ताबाबत कोणत्याही सदस्यांची सूचना वा आक्षेप आलेले नसल्यामुळे इतिवृत्तास मंजूरी देण्यांत आली.

<u>**कार्यक्रम बाब क्र.2**</u> : मंडळाच्या 68 व्या सभेतील बाबीवर करण्यांत आलेली कृती.

68 व्या सभेमध्ये ज्या कार्यक्रम बाबीवर चर्चा झाली होती व निर्णय घेण्यांत आलेले होते त्याबाबत करण्यांत आलेल्या कार्यवाहीबाबतची कल्पना सदस्य सचिवांनी दिली.

(कार्यक्रम बाब क्र.3–ब) : 1996–97 च्या वित्तीय वर्षाच्या अंदाजपत्रकाच्या संदर्भाबाबत पाणी पुरवठा विभागाचे प्रधान सचिवांनी असे स्पष्ट केले की, या संदर्भात विविध निर्णय घेणे शक्य व्हावे या दृष्टीने एक समिती नेमण्यांत यावी असे ठरले आहे. त्यानुसार या समितीच्या स्थापनेबाबत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने एक धारिका सादर केली असता त्याबाबत काही विचारणा करण्यांत आली आहे. तथापी जी समिती नेमण्यांत यावयाची आहे ती मंडळाची नसून ही समिती शासन स्तरावर नेमण्यांत यावयाची आहे व अशा समितीच्या स्थापनेनंतर मंडळाने उचलावयाच्या कर्जाबाबत हमी देणे यासारख्या बाबींवर त्वरित कार्यवाही करणे शक्य होईल व त्या दृष्टीने ही धारिका परत सादर करण्यांत येत आहे असे प्रधान सचिवांनी स्पष्ट केल्यावर, याबाबत आपण लक्ष घालू असे वित्त विभागाच्या सचिवांनी सांगितले.

(कार्यक्रम बाब क्र.7) : मंडळाची आर्थिक परिस्थिती, निधी वेळेवर मिळण्याची गरज इत्यादी.

या संदर्भात, गेले 4 महिने शासनाकडून नागरी योजनांसाठी काहीही निधी मुक्त करण्यांत आलेला नाही असे सदस्य सचिवांनी मंडळाच्या नजरेस आणून दिले. अलिकडेच निधी उपलब्ध करुन देण्यास सुरवात झाली असली तरी याबाबत एकंदरीत सुधारणा नाही यावर त्यांनी भर दिला.

(कार्यक्रम बाब क्र.8,9,10,11,17,18,19,20,21,23,25,28) – या विषयावरील कार्यक्रम बाबी 69 व्या बैठकीत पुन्हा सादर करण्यांत येत आहेत.

(कार्यक्रम बाब क्र.14) : पन्हाळा येथील पाणी पुरवठा योजनेबाबत.

मंत्री महोदयांनी पन्हाळयाजवळच्या एका गावाच्या योजनेच्या संदर्भात कांही मुद्दे उपस्थित केले. तथापि हे प्रकरण आणि मंडळाच्या 68 व्या बैठकीत चर्चा झाली तो विषय या दोन्ही बाबी भिन्न आहेत असे स्पष्ट करण्यांत आले. प्रधान सचिवांनी असा अभिप्राय व्यक्त केला की, पन्हाळा योजनेचे पाईप फुटल्याने बदलावे लागले व याबाबत परत तपासणी होणे जरुर आहे. अध्यक्षांनी अशी सूचना केली की, मंडळाचे कामाबाबत तक्रारी येत असतात हे ध्यानात घेता एखादी योजना खर्चाच्या मर्यादित या खर्चाच्या निकषात बसविण्याच्या दृष्टीने कोणतीही तडजोड करण्यांत येऊ नये.

या संदर्भात मृदु बीडाचे (Ductile Iron) पाईप अलिकडे उपलब्ध होऊ लागले असून आवश्यक त्या ठिकाणी ते वापरण्यांत येत आहेत असेही सदस्य सचिवांनी स्पष्ट केले. तरीही मंडळाच्या कामाबद्दल आक्षेप घेतले जाणार नाहीत अशा दृष्टीने योजना आखल्या जाव्यात याबाबत काळजी घ्यावी अशी अध्यक्षांनी सूचना केली. यावर सदस्य सचिवांनी हे नजरेस आणले की, सर्वच प्रकरणी सामुग्री खरेदी करण्याबाबतचे निर्णय क्षेत्रीय स्तरावरील निम्न अधिका–यांकडून घेतले जात नाहीत. अधिक व्यासाचे अधिक लांबीचे तसेच ज्या वाहिनीवर एकूण दाब मोठया प्रमाणावर अपेक्षित आहे अशा सर्व प्रकरणी मंडळाच्या केंद्रीय कार्यालयातील अधीक्षक अभियंता व मुख्य अभियंता तसेच सदस्य सचिव यांचेकडून बारकाईने पहाणी होऊन आवश्यक ते बदल करण्यांत येतात.

(कार्यक्रम बाब क्र.16) : अरमाळ समितीच्या अहवालास मान्यता देणे.

मुख्य अभियंता (प्रकल्प) यांनी असे स्पष्ट केले की, या अहवालाच्या संदर्भात जी कार्यवाही करण्याचे ठरले आहे त्याबाबत अलिकडील घडामोडी लक्षात घेता पुनर्विचार करावा लागणार आहे. बदललेल्या परिस्थितीत जी कार्यालये निर्माण करावयाची आहेत त्याबाबत अरमाळ समितीच्या शिफारशी लागू आहेत काय या विचारणेबाबत मुख्य अभियंता (प्रकल्प) यांनी स्पष्ट केले की, कोणती व किती कार्यालये निर्माण करावयाची हे मंडळाकडून ठरविण्यांत येत असले तरी, त्या त्या कार्यालयामध्ये किती कर्मचारी असावेत ही बाब अरमाळ समितीच्या शिफारशीनुसार ठरविण्यांत येणार आहे..

<u>कार्यक्रम बाब क्र.3</u> : मंडळातील अभियंत्यांना 1.1.1986 पासून सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत.

सदस्य सचिवांनी याबाबत माहिती दिली की ही कार्यक्रम बाब मान्यतेसाठी फिरवण्याच्या पध्दतीने सादर करण्यांत आली होती व हया कार्यक्रम बाबीला मंजूरी मिळालेली असून केवळ अनुसमर्थनासाठी ही बाब पुन्हा सादर करण्यांत आली आहे. सदस्य सचिवांनी हेही ध्यानात आणून दिले की याबाबत मंडळातील अभियंते अतिशय आग्रही असून त्यांनी आंदोलन सुरु केले आहे. याच महिन्यात दोन दिवस नैमित्तिक रजाही घेण्यांत आली. जरी ही सुधारित वेतनश्रेणी 1.1.1986 पासून लागू होणार असली तरी प्रत्यक्षात त्याचा लाभ 1.1.1996 पासूनच मिळणार आहे. जेणेकरुन 5 व्या वेतन आयोगाच्या अहवालावर जेव्हा कार्यवाही करण्यांत येईल तेव्हा या सुधारित वेतनश्रेणीच्या संदर्भात संबंधितांना याचा आर्थिक लाभ होईल.

प्रधान सचिवांनी अशी माहिती दिली की, मंडळाच्या या ठरावानुसार पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने या निर्णयास मान्यता मिळण्यासाठी वित्त विभागास धारिका सादर केली होती. तथापी हा प्रस्ताव मान्य करण्यांत आला नाही. वित्त विभागाच्या सचिवांनी असे स्पष्ट केले की शासनातील ज्या अभियंत्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यांत आली ते व मंडळातील अभियंते यांची तुलना होऊ शकणार नाही व म्हणून 5 व्या वेतन आयोगाचा अहवाल येईपर्यंत वाट पहावी असे धोरण आहे. यावर सदस्य सचिवांनी असे ध्यानांत आणून दिले की, शासनातील अभियंत्यांच्या सेवा मंडळाकडे वर्ग करताना काढलेल्या शासकीय निर्णयामध्ये जी आश्वासने देण्यांत आलेली आहे त्यापासून शासन ढळत आहे असा अर्थ निघू शकतो व तसे अभियंत्यांना वाटू शकते व कदाचित त्यातून कायद्याच्या दृष्टीने प्रश्न निर्माण होऊ शकतील. तेव्हा या बाबी ध्यानात घेऊन या संदर्भात सहानुभूतीपुर्वक विचार करावा अशी त्यांनी विनंती केली.

ही धारिका पुन्हा सादर करण्यांत यावी व याबाबत कांही आश्वासन देण्यांत येत नसले तरी ही बाब पुन्हा तपासून पहाण्यात येईल असे वित्त विभागाच्या सचिवांनी सांगितले. त्यावर ही धारिका सादर झाल्यावर मंडळाच्या सदस्य सचिवांना चर्चेसाठी बोलाविण्यांत यावे व या प्रकरणी शासनास कोणताही आर्थिक बोजा सहन करावा लागणार नाही ही बाब ध्यानात घेण्यांत यावी अशी सदस्य सचिवांनी विनंती केली.

उपाध्यक्षांनी यावर अशी पृच्छा केली की, हा प्रस्ताव मान्य झाल्यास किती खर्च येईल व 5 व्या वेतन आयोगाच्या शिफारशी अंमलात आल्यावर किती खर्च येईल? त्यावर असा खुलासा करण्यांत आला की, सरासरी वार्षिक रु. 2 कोटी 18 लाख इतका खर्च अपेक्षित असून 5 व्या वेतन आयोगाच्या शिफारशी अंमलात आल्यावर खर्च किती वाढेल हे आताच सांगता येणार नाही.. त्यावर उपाध्यक्षांनी असा अभिप्राय व्यक्त केला की, शासनाकडून मंडळाच्या सेवकांना वेतन व भत्ते देण्यासाठी प्रत्यक्षात अर्थ सहाय्य होत नसले तरी, अखेरीस शासनाच्या अर्थ सहाय्याने हाती घेतलेल्या योजनांवरील ई.टी.पी चार्जेस मधून हा खर्च करण्यांत येत असल्याने त्यासाठी अप्रत्यक्षरित्या शासनाचेच पैसे उपलब्ध होतात व म्हणून शासनाच्या धोरणानुसार 5 व्या वेतन आयोगाच्या अहवालावर शासन निर्णय घेईपर्यंत वाट पहाणे योग्य होईल. मंडळास मिळणा-या ई.टी. पी.मधून हा खर्च भागविला जाणार का, या विचारणेवर सदस्य सचिवांनी असे स्पष्ट केले की, अलिकडे वसई-विरार, सिडको अशा काही मोठया प्रकल्पांची कामे मंडळाकडे सोपविण्यांत आली असल्यामुळे ई.टी. पी. चार्जेस मध्ये वाढ होत असून वाढीव बोजा स्विकारण्यास काही अडचण येईल असे वाटत नाही.

अध्यक्षांनी असा अभिप्राय व्यक्त केला की " समान काम समान दाम " या तत्वानुसार सुधारित वेतनश्रेणी मंडळाच्या अभियंत्यांना लागू करणे उचित राहील, कारण असे न केल्यास आपणास शासनातील अभियंत्यापेक्षा कमी लेखले जात आहे अशाप्रकारचा न्यूनगंड मंडळाच्या अभियंत्यांमध्ये निर्माण होईल व तसा तो होऊ देणे योग्य होणार नाही. ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या सचिवांनी, असे सांगितले की, जर शासनाने शासनातील अभियंत्यांबाबत निर्णय घेतले असतील तर ते मंडळातील अभियंत्यांना लागू करावेत.

चर्चेअखेरीस पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या प्रधान सचिवांनी असे ध्यानात आणून दिले की, आता झालेली चर्चा ही मंडळाने करावयाच्या ठरावा पुरतीच आहे व हा ठराव पारित झाला तरी शासन अखेरीस आपल्या धोरणानुसारच कार्यवाही करील तेव्हा अनुसमर्थनास मंजूरी देण्यांत यावी. त्याप्रमाणे मंजूरी देण्यांत आली व खालील ठरावाला मंडळाने मान्यता दिली.

<u>ठराव :</u>

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या आस्थापनेवरील अभियंत्यांना पाटबंधारे विभागाच्या शासन निर्णय क्र.वेपूर-1092/(629/92)/अ(क्षे.प्र.), मंत्रालय, मुंबई-32 दिनांक 14.12.1985 मधील तरतुदीनुसार दि. 1.1.1986 पासून सुधारित वेतनश्रेण्या देण्याच्या ठरावास मंडळाच्या सदस्यांमध्ये फिरवून मा.अध्यक्षांनी (त्यावेळी मा.मुख्यमंत्री) मान्यता दिली आहे. त्या ठरावाला मंडळ आता अनुसमर्थन देत आहे.

शासनाकडून वरील सुधारित वेतनश्रेणी देण्यास मान्यता मिळविण्यासाठी पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार मंडळाचे सदस्य सचिव यांना देण्यास मंडळ संमती देत आहे.

**<u>कार्यक्रम बाब क्र.4 : (गोपनीय)</u>** : वसई-विरार उप प्रादेशिक पाणी पुरवठा योजना (सूया प्रकल्प उदभव धरुन) 1296 मि.मी. आणि 1168 मि.मी. बाह्य व्यासाची (एम.एस.) अशुध्द पाण्याची गुरुत्ववाहिनी 1440 मि.मी. बाह्य व्यासाची शुध्द पाण्याची उर्ध्ववाहिनी व 1540 मि.मी. व्यासाची गुरुत्ववाहिनी यांचा पुरवठा करणे, टाकणे, जोडणे (मासवण, बहाडोली ता.पालघर).

**<u>कार्यक्रम बाब क्र.5 :(गोपनीय)</u>** : वसई-विरार उप प्रादेशिक पाणी पुरवठा योजना (सूर्या प्रकल्प उदभव धरुन) 1200 मि.मी. व 1500 मि.मी. व्यासाची अशुध्द पाण्याची पी.एस.सी. गुरुत्ववाहिनीचे आणि शुध्द पाण्याची पी.एस.सी. गुरुत्ववाहिनीचे संकल्पन करणे, पुरवठा करणे, टाकणे व जोडणे, रस्ते व इतर क्रॉसींगकरिता पोलादी पाईप लाईन टाकणे (मासवण, बहाडोली ता.पालघर) या कामाची निविदा.

**कार्यक्रम बाब क्र.7 :** वसई–विरार उप प्रादेशिक पाणी पुरवठा योजना (सूर्या प्रकल्प उद्‌भव धरुन) शुध्द पाण्याच्या गुरुत्ववाहिनी करिता 1296/1540 मि.मी.व्यासाच्या पोलादी वाहिनीसाठी पाईपचा पुरवठा करणे, टाकणे, जोडणे, दहिसर वसई व राष्ट्रीय महामार्ग क्र.8 च्या समांतर कडेने व काशीव कोपरपर्यंत (चेनेज 5000 ते 7700 मि.मी., 24700 ते 25500 मि.मी. व 26300 ते 27800 मि.मी.).

**कार्यक्रम बाबत क्र.8 :** वसई–विरार उप प्रादेशिक पाणी पुरवठा योजना (सूर्या प्रकल्प उद्‌भव धरुन) दाब विमोचन टाकी ते मुख्य संतुलन टाकी पर्यंतच्या शुध्द पाण्याच्या गुरुत्ववाहिनी करिता 1200 मि.मी. व्यासाच्या प्रिस्टेस्ड कॉक्रीट पाईपचे संकल्पन करुन उत्पादन करणे, पुरवठा करणे, जोडणे व यशस्वी चाचणी देणे आणि 1296 मि.मी. व्यासाची पोलादी वाहिनी रस्ते व इतर क्रॉसींग करिता टाकणे, राष्ट्रीय महामार्ग क्र.8 च्या समांतर कडेने.

मुख्य अभियंता (प्रकल्प) यांनी वसई–विरार पाणी पुरवठा योजनेबाबत, निधीच्या उपलब्धतेबाबत, योजनेच्या उपांगांबाबत माहिती दिली व या संदर्भात कार्यक्रम बाब क्र.4 ते 8 या द्वारे निविदा मान्यतेसाठी सादर करण्यांत आली आहे असे सांगितले.

यापैकी पहिली निविदा ही प्रक्रिया पूर्व पाण्याची गुरुत्ववाहिनी व प्रक्रिया केलेल्या पाण्याची दाब वाहिनी अशा पोलादी वाहिनीचे कामाबाबत आहे. या कामासाठी 3 देकार आलेले असून त्यातील सर्वात कमी खर्चाचा देकार हा अशा कामाचा अनुभव असणा–या व अशी कामे करण्याची क्षमता असलेल्या कंत्राटदाराकडून आलेला असल्यामुळे तो स्विकारण्यास हरकत नाही असे सुचविले. याबाबतच्या निविदा ग्राहयतेबाबतचा कालावधीबाबत प्रधान सचिवांनी विचारणा केली असता सुरुवातीस हा कालावधी 29 जून, 1996 पर्यंत आहे तो आता 31 ऑक्टोबर, 96 पर्यंत वाढविला असल्याचे सांगितले. त्यावर जर या प्रकरणी न्यायालयाकडून देण्यांत आलेला स्थगिती आदेश 31 ऑक्टोबर, 96 पर्यंत उठवण्यांत आला नाहीतर काय करणार यावर मुख्य अभियंता यांनी स्पष्ट केले की सुर्या धरणातील पाणी जवळपासच्या पालघर आदी भागास उपलब्ध करुन न देता ते वसई–विरार भागात नेण्यास विरोध असल्याने ही बाब न्यायालयात नेण्यांत आली व संबंधीतांशी चर्चा करुन सूर्या धरणाचे पाणी 2007 सालापर्यंत मिळणार असून त्यानंतर एक नवीन धरण बांधण्यांत येणार आहे ही माहिती आंदोलकांना देण्यांत आल्यामुळे त्यांचा विरोध थोडा मावळत असल्याबाबतची माहिती मुख्य अभियंता (प्रकल्प) यांनी दिली. या संदर्भात या प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण करण्यांत न आल्यास परत आंदोलन करण्यात येण्याची शक्यता आहे.

या कामासाठी लागणारी जमीन उपलब्ध आहे कां? अशी प्रधान सचिवांनी विचारणा केली. राष्ट्रीय महामार्गाच्या बाजूची जी जमीन लागणार आहे ती, तसेच इतरत्र लागणारी जमीन ताब्यात घेण्याबाबत कारवाई सुरु असल्याचे सांगण्यांत आले. कामाची वर्क ऑर्डर देण्यापूर्वी जमीन ताब्यांत आहे ना, ही बाब तपासून घेतली जावी असे प्रधान सचिवांनी सांगितले.

या प्रकल्पात एकूण 4 निविदा विचारार्थ ठेवण्यांत आल्या आहेत. इतरत्र (मुख्यत: ग्रामीण योजनांसाठी) सर्वसाधारणत: एकच निविदा काढतात असे प्रधान सचिवांनी मत व्यक्त केले. अध्यक्षांनी असे मत व्यक्त केले की, लहान योजनांसाठी एकच निविदा असली तरी मोठया योजनांसाठी अश्या जास्त निविदा योग्य आहेत. मुख्य अभियंता (प्रकल्प) यांनी असा खुलासा केला की, जलशुध्दीकरण केंद्रासाठी, ते वेगळे काम असल्याने एक स्वतंत्र निविदा आहे. पोलादी पाईपचे काम आणि प्रिस्ट्रेस्ड चे काम याबाबतचा अनुभव असणारे कंत्राटदार निरनिराळे असल्याने या कामांची सुध्दा निविदा स्वतंत्रपणे काढणे आवश्यक आहे. योजनेच्या कामाची जी विभागणी करण्यांत आली ती कोणत्या तत्वावर अशी प्रधान सचिवांनी विचारणा करता, प्रिस्ट्रेस्ड पाईपसाठी कंत्राटदाराला पाईप निर्मितीसाठी फॅक्टरी उभारावी लागते, ही बाब ध्यानात घ्यावी लागते. तसेच या प्रकल्पासाठी एकूण सुमारे 10 निविदा काढण्यांत येत असून एकाच प्रकारच्या कामासाठी

सुध्दा कंत्राटदाराची काम पूर्ण करण्याची आर्थिक क्षमता आदी बाबी ध्यानात घेऊन निविदांची संख्या निश्चित केली जाते व अशीच पध्दत जागतिक बँकेच्या सहाय्याने हाती घेतलेल्या टेमघर पाणी पुरवठा योजनेच्या कामांत वापरली आहे हेही स्पष्ट केले.

सदस्य सचिवांनी असे सांगितले की या चर्चेमध्ये व्यक्त करण्यांत आलेले अभिप्राय लक्षांत घेवून यापुढे निविदा काढण्यांत येतील. उपाध्यक्षांनी अशी विचारणा केली की 10 – 12 कोटी रुपये किंमतीची कामे करण्याची क्षमता असणा–या कंत्राटदारांऐवजी 25 कोटी रुपये किंमतीची कामे करणारा एकच कंत्राटदार उपलब्ध होणार नाही काय? याचाही विचार करणे योग्य होईल.

याचबरोबर कार्यक्रम बाब क्र.5, 7 व 8 यामध्ये सादर केलेले पोलादी व प्रिस्ट्रेस्ड पाईपांच्या निविदांच्या संदर्भात ज्या कंत्राटदारांच्या निविदा मंजूर करण्याचे प्रस्तावित करण्यांत आले आहे त्या कंत्राटदारांची क्षमता, त्यांचा अनुभव, सध्या त्यांच्याकडे असलेली कामे इ. बाबतची माहिती मुख्य अभियंता (प्रकल्प) यांनी दिली.

तथापी, याबाबतचा ठराव करताना " न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये लागणा–या निर्णयांच्या अधिन राहून " असा उल्लेख करण्याच्या सूचना प्रधान सचिवांनी दिल्या.

या चर्चेनंतर कार्यक्रम बाब क्र.4, 5, 7 व 8 मध्ये विषद केल्यानुसार ठरावास खालीलप्रमाणे मान्यता देण्यांत आली.

**ठराव : कार्यक्रम बाब क्र.4 :**

**"न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये लागणा–या निर्णयांच्या अधिन राहून"** रु. 11,06,59,966/– (रुपये अकरा कोटी सहा लाख एकोणसाठ हजार नऊशे सहासष्ट मात्र) किंमतीची, मे. कोया आणि कंपनी, हैद्राबाद यांची, कमीत कमी किंमतीची रिस्पॉनसिव्ह व तांत्रिक दृष्टया योग्य असलेली निविदा स्विकारण्यास मंडळ मान्यता देत आहे. या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यास मंडळाच्या सदस्य सचिवांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

**ठराव : कार्यक्रम बाब क्र.5 :**

**"न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये लागणा–या निर्णयांच्या अधिन राहून"** रु. 11,50,51,333/– (रुपये अकरा कोटी पन्नास लाख एक्कावन हजार तीनशे तेहेतीस फक्त) किंमतीची मे. तापी प्रास्ट्रेस्ड प्रॉडक्टस् लिमिटेड, अंजाळे, जि.जळगांव यांची कमीत कमी (अंदाजपत्रकापेक्षा 12.60 टक्के कमी) रिस्पॉन्सीव्ह व तांत्रिक दृष्टया योग्य असलेली निविदा स्वीकारण्यास मंडळ मान्यता देत आहे. या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यास मंडळाच्या सदस्य सचिवांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

**ठराव : कार्यक्रम बाब क्र.7 :**

**"न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये लागणा–या निर्णयांच्या अधिन राहून"** रु. 9,37,32,239/– (रु. नऊ कोटी सदतीस लाख बत्तीस हजार दोनशे एकोणचाळीस फक्त) किंमतीची मे.सुरेंद्र इंजिनियरींग कंपनी, प्रा. लि., मुंबई यांची सर्वात कमी (अंदाजपत्रकापेक्षा 6.96 टक्के कमी) व प्रतिसादात्मक व तांत्रीकदृष्टया योग्य असलेली निविदा स्विकारण्यास मंडळ मान्यता देत आहे. या प्रकरणी पुढील आवश्यक कार्यवाही करण्यास मंडळाच्या सदस्य सचिवांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

ठराव : कार्यक्रम बाब क्र.8 :

"न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये लागणा-या निर्णायांच्या अधिन राहून" रु. 8,80,46,889/- (रुपये आठ कोटी ऐंशी लाख सेहेचाळीस हजार आठशे एकोणनव्वद फक्त) किंमतीची मे. तापी प्रिस्ट्रेस्ड प्रॉडक्टस लि. अंजाळे, जिल्हा-जळगांव यांची कमीत कमी किंमतीची (अंदाजपत्रकापेक्षा 7.5 टक्के कमी) प्रतिसादात्मक व तांत्रीकदृष्टया योग्य असलेली निविदा स्विकारण्यास मंडळ मान्यता देत आहे. या प्रकरणी पुढील आवश्यक कार्यवाही करण्यास मंडळाच्या सदस्य सचिवांना प्राधीकृत करण्यांत येत आहे.

कार्यक्रम बाब क्र.6 : प्रतिदिनी 100 द.ल.लि. क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्राची कामे.

मुख्य अभियंता (प्रकल्प) यांनी असे स्पष्ट केले की. ही कार्यक्रम बाब पूर्वी सरक्युलेशनने सादर करण्यांत आली होती व त्याला मंजूरीही मिळालेली होती व आता ही बाब फक्त अनुसमर्थनार्थ सादर करण्यांत येत आहे. त्यासही मंडळाने मान्यता दिली.

ठराव :

रु. 5,77,54,080/- (रुपये पाच कोटी सत्याहत्तर लाख चोपन्न हजार ऐंशी फक्त) किंमतीची मे.एस.एन.घारपुरे, पुणे यांची कमीत कमी किंमतीची (अंदाजपत्रकापेक्षा 7.20 टक्के कमी) रिस्पॉन्सिव्ह व तांत्रिकदृष्टया योग्य असलेली निविदा स्विकारण्याच्या ठरावास मंडळाच्या सदस्यांनी, कार्यक्रम बाब सदस्यांमध्ये फिरवून, मान्यता दिली आहे. सदर ठरावाला मंडळ आता अनुसमर्थन देत आहे.

कार्यक्रम बाब क्र.9 : जागतिक बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र पाणी पुरवठा व परिसर स्वच्छता प्रकल्प टप्पा-2 मधील पॅकेज-4 च्या निविदेच्या स्विकृतीस मान्यता.

मुख्य अभियंता (जागतिक बँक ग्रामीण प्रकल्प) यांनी या निविदेसंबंधी माहिती दिली. त्यांनी असे सांगितले की. या प्रकल्पातील गट-4 मधील क्र 28 ते 31. 33 व 34 ते 38 या स्विकारण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाचे मार्फत जागतिक बँकेकडे पाठविण्यांत आला आहे. त्यावरील प्रस्ताव क्र.30, 31 व 34 ते 38 च्या निविदा व त्यातील वाढीव खर्च यांस शासनाकडून व जागतिक बँकेकडून अंतीम मान्यता मिळालेली आहे तर निविदा क्र. 28, 29 व 33 च्या संदर्भात जागतिक बँक व शासन यांचेकडून मान्यता प्राप्त व्हावयाची आहे.

या निविदेमध्ये कामाचे अंदाजपत्रक 1991-92 च्या जिल्हा दरसूचीनुसार तयार करण्यांत आलेले असल्याने आता ज्या निविदा स्विकारार्थ ठेवलेल्या आहेत त्या मूळ अंदाजित खर्चाच्या 36 ते 99 टक्के जास्त अशा मर्यादेतील आहेत.

मुख्य अभियंत्यांनी असेही स्पष्ट केले की. गेल्या 4 वर्षाच्या काळामध्ये झालेली भाववाढ लक्षात घ्यावी लागेलच पण याशिवाय इतरही अशी अनेक कारणे आहेत की जी या निविदा स्विकारण्याच्या संदर्भात ध्यानात घ्यावी लागतील त्यांची माहिती कार्यक्रम बाबीतील परिशिष्ट-3 (ब) मध्ये देण्यांत आली आहेत. याचे कारण म्हणजे जागतिक बँकेने घातलेल्या विशिष्ट अटी असून ही कारणे मान्य करणे क्रमप्राप्त आहे.

मुख्य अभियंत्यांच्या या स्पष्टीकरणानंतर निविदा क्र.30, 31 व 34 ते 38 स्विकारण्यासंबंधी मंडळाच्या सदस्य सचिवांनी केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूर देण्यांत आली तसेच निविदा क्र.28, 29 व 33 च्या संदर्भात जागतिक बँक व शासन यांचेकडून मान्यता प्राप्त झालेल्या निविदा स्विकारण्यास मान्यता देण्यांत आली व खालील ठरावास मंडळाने मान्यता दिली.

<u>ठराव :</u>

1. महाराष्ट्र ग्रामीण पाणी पुरवठा व परिसर स्वच्छता प्रकल्पांतर्गत गट 4 मधील निविदा 28 ते 31, 33 आणि 34 ते 38 च्या स्विकारार्थ तसेच योजनेच्या अंदाजित खर्चापेक्षा होणा–या जास्त खर्चास मान्यता मिळविण्यासाठी शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावास कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे.

2. शासन व जागतिक बँकेची वरील पैकी निविदा क्र.30, 31 व 34 ते 38 च्या खर्चास अंतिम मान्यता मिळालेली असल्यामुळे, निविदा क्र.30, 31 आणि 34 ते 38 स्विकारण्यासंबंधी मंडळाचे सदस्य सचिव यांनी केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे.

3. निविदा क्र.28, 29 व 33 विषयी जागतिक बँक व शासन यांचेकडून मान्यताप्राप्त झालेनंतर त्या निविदा स्विकारण्यासहि मान्यता देण्यांत येत आहे.

**<u>कार्यक्रम बाब क्र.10 :(गोपनीय) :</u>** जागतिक बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र पाणी पुरवठा व परिसर स्वच्छता प्रकल्प टप्पा–1, ठाणे जिल्हयातील बडापोखरण प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेअंतर्गत अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनेच्या पुनर्वसन करावयाच्या कामाबाबतच्या निविदा स्विकृतीबाबत.

सदस्य सचिव यांनी ठराव मांडला व तो मांडताना या प्रकारच्या कामाचे सर्वसाधारण स्वरुप स्पष्ट केले. त्यावर मा.अध्यक्ष यांनी असे सुचविले की, अशा प्रकारच्या लहान कामाचे गाववार गट करुन नवीन उत्तीर्ण झालेल्या अभियंत्यांना ती कामे दरपत्रकाच्या दराने देता येतील कांय ते पहावे. या विषयी जागतिक बँकेकडे विचारणा करण्यांत येईल असे सांगितल्यानंतर खालीलप्रमाणे ठराव संमत झाला.

*<u>ठराव :</u>*

जागतिक बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र पाणी पुरवठा व परिसर स्वच्छता प्रकल्प टप्पा–1 मधील बडापोखरण प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, जिल्हा–ठाणे अंतर्गत, अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनांच्या पुनर्वसनाच्या कामांसाठी प्राप्त झालेली मे. परेश कंन्स्ट्रक्शन कंपनी, मुंबई यांची अंदाजित खर्चापेक्षा 34.10 टक्के जादा रु. 13.26 लाख खर्चाची निविदा स्वीकारण्यासंबंधी मंडळाचे सदस्य सचिव यांनी केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे.

**<u>कार्यक्रम बाब क्र.11 :</u>** पिंपरी चिंचवड भुयारी गटार योजना टप्पा – 1, भाग–2.

मुख्य अभियंता (नागरी) यांनी या कामाबाबत व निविदेबाबत महिती दिली. त्यांनी हे स्पष्ट केले की, वाढीव क्षमतेच्या मलशुध्दीकरण केंद्राचा खर्च (40–27 द.ल.लि.) महापालिका करणार आहे. फकत हे काम मंडळ करणार असून बाकी कामे महानगरपालिका करणार आहे.

या निविदेच्या मूल्यमापनाबाबत व्ही.जे.टी.आय. या महाविद्यालयाचा तांत्रिक सल्ला घेण्यांत आल्याचे सांगून सर्वात कमी किमतीचा देकार योग्य असल्याचे मत महाविद्यालयाने दिल्याचे मुख्य अभियंता यांनी सांगितले.

प्रधान सचिवांनी, ऐअरेशनला जास्त वीज लागून खर्च वाढतो व एक्सटेंडेड ऐअरेशनला खर्च किती येईल अशी विचारणा केली. मुख्य अभियंता (प्रकल्प) यांनी खुलासा केला की, सेकंडरी प्रक्रिया केली जाते तेव्हा खर्च जास्त येतो. प्रधान सचिवांनी अशीही विचारणा केली की, लागणा–या अश्वशक्तीचा जो फरक आहे त्याचा परिणाम स्पष्ट केला जावा म्हणजे समान पायावर तुलना होऊ शकेल. याबाबत पृष्ठ क्र.71 वर माहिती दिल्याचे सांगण्यांत आले.

ग्राम विकास व जलसंधारण सचिवांनी तांत्रिक मुद्दा उपस्थित केला की, यु.ए.एस.बी. ही कमी खर्चाची सोपी पध्दत कां स्वीकारली जात नाही? आपण पर्यावरणाचा विचार करावा व कानपूर येथे याबाबत चांगला अनुभव आहे ही बाब ध्यानांत घ्यावी असा अभिप्राय व्यक्त केला. मुख्य अभियंता (प्रकल्प) यांनी खुलासा केला की, ही पध्दत संपूर्ण व सिध्दहस्त नाही. बीओडीत व्हावयाची घट निकषाइतपत कमी होत नाही म्हणून पुनःप्रक्रिया करावी लागेल व खर्च जास्त येईल. देशांत एकदोन ठिकाणीच ही पध्दत वापरांत असून याचा वापर सावधगिरीने करावा असे सी.पी.एच.इ.ई.ओ. च्या मॅन्युअलमध्ये स्पष्ट केल्याचे ध्यानांत आणून दिले.

या प्रकरणी कमी क्षमतेची अश्वशक्ती पुरवायचे जे ठरले आहे त्याबाबत बाजारभावाने कपात केली जाईल हे स्पष्ट केल्यावर निविदा स्वीकरावयाचा प्रस्ताव मंजूर झाला.

सदस्य सचिवांनी या आधीच्या एका प्रस्तावाचा पुनः एकदा उल्लेख केला की, अशा तांत्रिक प्रकरणी मंडळाच्या एका समितीने बैठकीआधी सखोल चर्चा करुन विचार करणे उपयुक्त राहील.

प्रधान सचिवांनी असाही मुद्दा उपस्थित केला की, शुध्दीकरणानंतर मलप्रवाह नदीत सोडण्याचे संदर्भात केंद्र शासनाने नव्याने जाहीर केलेले निकष अधिक कडक आहेत. त्याची माहिती घेण्यांत यावी. त्यानंतर खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यांत आला.

<u>ठराव :</u>

मे.गोंडवाना इंजि. प्रा.लि., नागपूर यांची पिंपरी चिंचवड भुयारी गटार योजना टप्पा–1, भाग–2 ची कासारवाडी येथे पंपींग स्टेशन क्र.3 बांधणे, पंपींग मशिनरी बसविणे, 900 मि.मी. व्यासाची पोलादी दाबनलिका आणि 40 द.ल.लि. प्रतिदिनी क्षमतेचा पारंपारिक मलशुध्दीकरण प्रकल्प बांधणेची रु. 8,29,25,340/– किंमतीची कमीत कमी निविदा जी निविदेला दिलेल्या किंमतीपेक्षा 1.52 टक्के कमी आहे, स्विकारणेचा प्रस्ताव मंडळ मान्य करीत आहे. मंडळ या बाबतीतील पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठीचे अधिकार सदस्य सचिव यांना प्रदान करीत आहे.

<u>**कार्यक्रम बाब क्र.11 (अ)**</u> : मिरा भाईंदर नगरपालिकेकरिता अतिरिक्त 50 द.ल.लि. प्रतिदिनी क्षमतेची पाणी पुरवठा योजना पूर्ण ठेव तत्वावर घेणेबाबत.

मुख्य अभियंता (प्रकल्प) यांनी भाईंदरच्या पाणी पुरवठ्याबाबतच्या तीव्र टंचाईची माहिती देऊन त्याबाबत आखण्यांत आलेल्या योजनेची माहिती दिली. नगरपालिका ही योजना सुरुवातीस स्वखर्चाने हाती घेणार असून त्याचे काम पूर्ण ठेव जमा तत्वावर मंडळावर सोपविण्यांत येत आहे. व भविष्यात शासनाकडून अनुदान प्राप्त करुन घेण्याचे प्रयत्नही केले जाणार आहेत असे स्पष्ट केले. या कामासाठी "मंडळाच्या नियमाप्रमाणे ई.टी.पी. चार्जेस लावले जातील " असे ठरावात म्हणण्याचे ठरले व कार्यक्रम बाब मंजूर झाली आणि खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यांत आला.

<u>ठराव :</u>

मिरा भाईंदर नगरपालिकेसाठी रु. 118.86 कोटी अंदाजित खर्चाची अतिरिक्त 50 द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेची योजना पूर्ण ठेव काम म्हणून हाती घेण्यास मंडळ मान्यता देत आहे. हयासाठी कराव्या लागणा–या करारांसाठी मंडळाचे सदस्य सचिव हयांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

<u>कार्यक्रम बाब क्र.12 :</u> मंडळाच्या मालकीच्या अहमदनगर वाढीव पाणी पुरवठा योजनेस अतिरिक्त कर्मचारी पदे निर्माण करण्याबाबत.

मुख्य अभियंता (प्रकल्प) यांनी या विषयाची पार्श्वभूमती विषद केली. मंडळाच्या अध्यक्षांनी असे प्रतिपादन केले की, मंडळ, पाणी पुरवठा योजनांवर जास्त प्रमाणात कर्मचारी वर्ग नेमते व त्यामुळे अशा कर्मचा–यांसह योजना हस्तांतर करुन घेण्यास नगरपालिका राजी होत नाहीत, त्यादृष्टीने अशा योजनांवर कमीत कमी कर्मचारीवृंद नेमण्यांत यावा, त्यायोगे नगरपालिकांना अशा कर्मचा–यांवरील खर्च डोईजड होणार नाही. त्यादृष्टीने प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग हयांनी असे मत प्रदर्शित केले की, अशा योजना हस्तांतर करण्याला प्राधान्य देण्यांत यावे व त्या योजनांवर जर अतिरिक्त कर्मचारीवृंदांची गरज असलीतर त्या त्या नगरपालिकांनी पदे मंजूर करुन घ्यावी. मुख्य अभियंता (प्रकल्प) यांनी नगरपालिका विजेचे देयक व नवीन योजनेसाठी कनेक्शनपोटी करावयाचा भरणा देखील करत नसल्यामुळे योजना कार्यान्वित करण्याची शक्यता कमी आहे असे स्पष्ट केले. मा.अध्यक्षांनी मा. उपाध्यक्षांना याबाबत लक्ष घालण्याची विनंती केली व नगरपालिकांची लवकरच बैठक घ्यावी असे सुचविले व ते मा.उपाध्यक्षांनी मान्य केले. तेव्हा, योजना प्रत्यक्ष कार्यान्वित करावयाचे निश्चित होईल तेव्हाच हा प्रस्ताव परत बैठकीसमोर विचारार्थ ठेवावा असे मा.अध्यक्षांनी आदेश दिले.

<u>कार्यक्रम बाब क्र.13</u> : मुख्य अभियंता कार्यालयाची निर्मिती व आयत्यावेळी विचारार्थ ठेवण्यांत आलेली बाब : नागरी तसेच ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी क्षेत्रीय यंत्रणेची पुनर्रचना व बळकटीकरण.

पूर्वी ही बाब विचारांत घेतली होती पण आता सुधारलेल्या स्वरुपात मांडली असल्याचे मुख्य अभियंता (प्रकल्प) यांनी स्पष्ट केले. आता 4 ऐवजी 6 प्रादेशिक मुख्य अभियंत्यांची कार्यालये निर्माण करावयाची असून नवीन 4 मुख्य अभियंत्यांच्या पदांच्या व इतर पदांच्या निर्मितीचा प्रस्ताव आहे.

जागतिक बँकेसह इतर विदेशी अर्थसहाय्याने ग्रामीण भागांत हाती घ्यावयाच्या प्रकल्पासाठी मुख्य अभियंता (जागतिक बँक ग्रामीण प्रकल्प) हे पद आवश्यक असले तरी मुख्य अभियंता (प्रकल्प) हे नागरी प्रकल्पांसाठीचे स्वतंत्र पद आवश्यक आहे काय असा मुद्दा प्रधान सचिवांनी उपस्थित केला. नागपूर सारख्या प्रकल्पांची अंमलबजावणी तिथे राहणा–या मुख्य अभियंता यांचेकडे सोपवणे अधिक संयुक्तिक राहील असे त्यांचे म्हणणे होते.

यावर ऊहापोह होऊन असे ठरले की, प्रत्येक महसूल विभागात एक अशी 6 मुख्य अभियंत्यांची कार्यालये असावी. त्यासाठी नव्याने 4 मुख्य अभियंत्यांची व इतर पदे निर्माण केली जावी. मुख्य अभियंता (जागतिक बँक ग्रामीण प्रकल्प) हे पद व कार्यालय आहे असेच चालू रहावे. मुख्य अभियंता (प्रकल्प) हे पदही तसेच राहून त्यांचेकडे ठाण्याच्या आसपासचे (25 कोटीहून जास्त किंमतीचे) प्रकल्प सोपविले जावेत एवढेच नव्हेतर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या केंद्रीय कार्यालयांत सदस्य सचिव स्तरांवरची जी 3 पदे राहणार आहेत. त्यापैकी एका पदाचा कार्यभार मुख्य अभियंता (प्रकल्प) यांचेकडे देण्याबाबत विचार व्हावा. त्यानंतर 6 प्रादेशिक मुख्य अभियंत्यांच्या कार्यालयांच्या निर्मितीचा व 4 मुख्य अभियंत्यांच्या पदासह एकूण 52 पदांच्या निर्मितीचा प्रस्ताव मंजूर झाला.

प्राधिकरणाच्या केंद्रीय कार्यालयांतील सदस्य सचिव स्तरांवरील 3 पदांपैकी सध्याचे सदस्य सचिव एका पदावर, मुख्य अभियंता (प्रकल्प) पदाची श्रेणीवाढ करुन दुस–या पदावर तर तिस–या पदावर सनदी अधिकारी नेमले जाण्याची शक्यता प्रधान सचिवांनी वर्तवली.

यावेळी अधीक्षक अभियंत्यांच्या कार्यालयांची रचना कशी असेल अशी प्रधान सचिवांनी विचारणा करता या संदर्भात एक आयत्यावेळी विचारांत घेणेची कार्यक्रम बाब सादर केली आहे ती ध्यानांत घ्यावी अशी मुख्य अभियंता (प्रकल्प) यांनी विनंती केली.

त्यानंतर चर्चा होऊन अधीक्षक अभियंत्यांची कार्यालये खालीलप्रमाणे असावी असे ठरले.

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | विदर्भ विभाग. | 3 कार्यालये. | – नागपूर येथे एक<br>– भंडारा येथे एक(भंडारा व गडचिरोली जिल्हे)<br>– चंद्रपूर येथे एक(चंद्रपूर व वर्धा जिल्हयांसाठी) |
| 2) | अमरावती विभाग. | 4 कार्यालये. | अमरावती, अकोला, यवतमाळ व बुलढाणा येथे प्रत्येकी एक. |
| 3) | मराठवाडा विभाग. | 4 कार्यालये. | – औरंगाबाद व जालना जिल्हयांसाठी मिळून औरंगाबाद येथे एक.<br>– नांदेड जिल्हयासाठी एक.<br>– बीड व परभणी जिल्हे मिळून बीड येथे एक.<br>– लातूर व उस्मानाबाद या दोन जिल्हयांसाठी मिळून लातूर येथे एक. |
| 4) | नाशिक विभाग. | 3 कार्यालये. | – नाशिक येथे एक.<br>– अहमदनगर येथे एक.<br>जळगांव व धुळे जिल्हयांसाठी मिळून जळगांव येथे एक. |
| 5) | पुणे विभाग. | 5 कार्यालये.<br>(4 नविन<br>1 अस्तित्वातील) | – पुणे येथे एक.<br>– सातारा येथे एक.<br>– सोलापूर येथे एक.<br>– सांगली व कोल्हापूर जिल्हयांसाठी मिळून सांगली येथे एक.<br>– जागतिक बँक ग्रामीण प्रकल्पासाठीचे पुणे येथील एक (अस्तित्वातील). |
| 6) | कोकण विभाग. | 3 कार्यालये. | – रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयांसाठी मिळून रत्नागिरी येथे एक.<br>– तसेच ठाणे येथे अस्तित्वात असणा–या क्र.1 व 2 या परिमंडळ कार्यालयाकडे अनुक्रमे ठाणे व रायगड या जिल्हयांचे काम सोपवले जाईल. |
| | | 22 कार्यालये. | |

या अधीक्षक अभियंत्यांच्या कार्यालयांत प्रत्येक जिल्हयांसाठी एक असे प्रशासकीय अधिका–याचे (बिगर तांत्रिक) एक पद राहील.

शिवाय इतरत्र स्थापत्य अधीक्षक अभियंत्यांची पदे खालीलप्रमाणे राहतील.

| | | |
|---|---|---|
| मध्यवर्ती नियोजन संनियंत्रण. | | 1 पद. |
| मुख्यालय व संकल्पचित्रे आणि सामुग्री. | | 1 पद. |
| गुण नियंत्रण. | | 2 पदे. |
| नाशिक प्रशिक्षण केंद्र. | | 1 पद. |
| जागतिक बँक ग्रामीण प्रकल्प कार्यालय. (कार्यालयीन पद) | | 1 पद. |
| | एकूण | 6 पदे. |

तसेच यांत्रिकी अधीक्षक अभियंत्याची 3 पदे ठाणे येथे 1 (अस्तित्वातील). पुणे येथे 1 व नागपूर येथे 1. (यापैकी ठाणे येथील पद अस्तित्वांत असून उरलेली 2 पदे कार्यक्रम बाब क्र.13 मध्ये उल्लेख केलेल्या (व या बैठकीत मंजूर झालेल्या) 52 पदांमध्ये समाविष्ट आहेत.).

वर उल्लेख केल्याप्रमाणे अधीक्षक अभियंत्यांची 22 कार्यालये प्रस्तावित असली तरी हे अधिकारी आता त्या त्या जिल्हयासाठी " जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी " म्हणून काम करणार असल्याने व त्या जिल्हयांतील पाणी पुरवठयाबाबतची संपूर्ण जबाबदारी त्यांचेवर राहणार असल्याने प्रत्येक जिल्हयासाठी स्वतंत्र अधीक्षक अभियंत्यांच्या कार्यालयाच्या आवश्यकतेवर अध्यक्ष व उपाध्यक्ष या दोघांनीही भर दिला. तसे झाल्यास आणखी 8–9 कार्यालये निर्माण करावी लागतील.

अधीक्षक अभियंता कार्यालयांत कमीत कमी किती पदे असावीत. त्यासाठी कमीत कमी किती खर्च येईल याचा आढावा घेऊन 22 कार्यालये निर्माण केल्यास एकूण किती खर्च येईल व प्रत्येक जिल्हयासाठी अधीक्षक अभियंत्याचे कार्यालय नेमण्याचे झाल्यास एकूण खर्च किती येईल हा तपशील पुढील बैठकीत सादर करावा असे आदेश अध्यक्षांनी दिले.

तसेच ही अधीक्षक अभियंत्यांची पदे भरण्याच्या संदर्भात मंडळांत अनुभवी व लायक अभियंते उपलब्ध नसतील तर पाटबंधारे विभागांतून अधीक्षक अभियंता वा वरिष्ठ कार्यकारी अभियंत्यांना कांही प्रमाणांत प्रतिनियुक्तीवर घेण्यांत यावेत असा मुद्दा मांडला गेला.

<u>ठराव :</u>

कार्यक्रम बाबीत दिलेल्या बाबीवर सविस्तर चर्चा होऊन पुढील प्रमाणे ठराव करण्यांत येत आहे.

अ) शासनातील पाटबंधारे विभाग तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे धर्तीवर मंडळातही प्रादेशिक मुख्य अभियंत्यांची कार्यालये निर्माण करण्यांत यावी.

आ) राज्यातील 6 महसुली विभागासाठी, म्हणजेच नागपूर, अमरावती, औरंगाबाद, पुणे, नाशिक व कोकण विभागासाठी प्रत्येकी अेका प्रादेशिक मुख्य अभियंत्याची कार्यालये निर्माण करण्यांत यावीत.

इ) ही 6 कार्यालये निर्माण करण्याचे दृष्टीने परिच्छेद 6.2 मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे मुख्य अभियंत्यांची 4 नवीन पदे निर्माण करण्यांत यावीत.

ई) परिच्छेद 6.1 मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे मोठया स्वरुपाची नागरी कामे पहाणारे मुख्य अभियंता (प्रकल्प) हे कार्यालय तसेच जागतिक बँक सहाय्यीत आणि भूकंप क्षेत्रातील कामे पहाणारे जागतिक बँक ग्रामीण प्रकल्पाच्या मुख्य अभियंत्यांचे कार्यालय, ही दोन मुख्य अभियंत्यांची कार्यालये मुंबई/ठाणे या ठिकाणीच असू द्यावीत. शिवाय मुख्य अभियंता (प्रकल्प) यांनी यापुढे रु. 25 कोटीपेक्षा जास्त किंमतीची नागरी पाणी पुरवठा व जलनिःसारण योजनांची कामे पहावीत.

उ) या प्रादेशिक मुख्य अभियंत्यांच्या कार्यालयासाठी परिच्छेद 6.2 मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे व प्रपत्र–4 मध्ये दाखविल्यानुसार अभियंत्यांची 37 व बिगर तांत्रिक कर्मचा–यांची 15 अशी एकूण 52 पदे निर्माण करण्यांत यावीत.

ऊ) या संबंधी शासनाशी पत्रव्यवहार करुन त्या संदर्भात उचित अशी कार्यवाही करण्यांस मंडळाचे सदस्य सचिवांना अधिकार प्रदान करण्यांत येत आहेत.

<u>**कार्यक्रम बाब क्र.14**</u> : यवतमाळ वाढीव पाणी पुरवठा योजना (चापडोह स्त्रोत) " मंडळाची योजना " म्हणून कार्यान्वित करण्याबाबत.

यवतमाळ पाणी पुरवठा योजनेचे काम सध्या सुरु असून, मुळच्या असून रु.27.20 कोटी किंमतीच्या या योजनेवर चापडोह धरणाचे साठी खर्च होत आहे. या योजनेचा वाढीव खर्च ध्यानांत घेता व त्यातील नागरी व ग्रामीण अशी खर्चाची विभागणी करुन रु. 39.52 कोटी रुपये किंमतीच्या योजनेस सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचीबाब. शासनाच्या विचाराधीन आहे अशी मुख्य अभियंता (प्रकल्प) यांनी माहिती दिली. दरम्यान या योजनेची किंमत पुनः वाढली असून ती आता रु.62.77 कोटी (कर्जफेडीच्या रकमेची तरतूद करता यावी या दृष्टीने केलेले भांडवलीकरण (कॅपिटलायझेशन) ध्यानांत घेऊन रु. 72.09 कोटी) झाली आहे. या योजनेचा आर्थीक बोजा विशेषतः कर्ज यवतमाळ नगरपरिषदेने स्वीकारण्याबाबत नगरपालिकेशी पत्रव्यवहार केला असता अशाप्रकारचा बोजा सहन करण्यास नगरपालिकेने नकार दिला असूनही वाढीव योजना " मंडळाची योजना " म्हणून शासनाने कार्यान्वित करावी अशी नगरपालिकेने मागणी केल्याचे मुख्य अभियंत्यांनी मंडळाच्या नजरेस आणून दिले.

यवतमाळ शहाराच्या योजनेची ही मागणी मान्य केल्यास अशीच मागणी इतरत्रही येईल असा मुद्दा उपस्थित केला गेला. उपाध्यक्षांनी असे सांगितले की, नागरी भाग काय किंवा ग्रामीण भाग काय, योजना चालविणे, त्याची देखभाल करणे, पाण्याचे दर लावणे व महसूल गोळा करणे या सा–या बाबी (शासनाची तशी अपेक्षा असून सुध्दा) स्थानिक संस्था करु शकतील असे वाटत नाही. यवतमाळ शहराचे संदर्भात असा निर्णय घेण्यास त्यांचा विरोध नाही पण असा निर्णय एखाद्या योजनेच्या संदर्भात न घेता अशा त–हेचा धोरणात्मकच निर्णय घेणे अधिक उचित राहील असा अभिप्रायहि त्यांनी व्यक्त केला. प्रधान सचिवांनी मात्र असे ध्यानांत आणून दिले की, मुख्यमंत्र्यांनी यापूर्वी अनेक वेळा व्यक्त केल्याप्रमाणे या सर्व योजना मंडळाने पूर्ण करावयाच्या व स्थानिक संस्थांकडे हस्तांतरीत करावयाच्या असे धोरण रहाणार आहे.

सदस्य सचिवांनी आपला अभिप्राय मांडताना असे सांगितले की, यवतमाळ शहरापुरता का होईना पण असा विचार करणे आवश्यक आहे. या शहरात पाणी पुरवठयाची इतकी चांगली व्यवस्था यापूर्वी शासनाने उपलब्ध करुन दिली होती की, तेथे 24 तास पाणी पुरवठा उपलब्ध होत असे आणि आता तेथे परिस्थिती इतकी बिघडलेली आहे की, एक दिवसाआड पाणी पुरवठा होत आहे. सध्याच्या योजनेच्या अंमलबजावणीचे संदर्भात मंडळ एकप्रकारे अडकलेले आहे असे म्हणता येईल. कारण योजनेवर खर्च सुरु आहे.. चापडोह धरणाचे कामास पाटबंधारे खात्याकडून सुरुवात करण्यांत आली आहे व आता हे काम थांबवायचे तरी कसे, व नगरपालिकेची मागणी मान्य केल्याशिवाय पुढे जायचे तरी कसे, असा प्रश्न निर्माण

झाला आहे. जर ही योजना मंडळाची म्हणून हाती घेतल्यास या योजनेसाठी घ्यावयाच्या कर्जाच्या परतफेडीची जबाबदारी मंडळावर येईल. मंडळ सध्या या शहरास थेट पाणी पुरवठा करुन महसूल गोळा करीत आहे. हीच पध्दत चालू ठेवून त्या महसूलातून या कर्जाची परतफेड करावी लागेल. ही योजना नगरपालिकेची योजना म्हणून हाती घेतल्यास व नगरपालिकेने चालविण्यांस जे दर लावावे लागतील ते परवडणारे राहणार नाहीत.

अध्यक्षांनी अशी सूचना केली की, जर अशी योजना मंडळ स्वतःची योजना म्हणून हाती घेऊ लागले तर मंडळाला ते परवडेल काय व अशा पाणी पुरवठा केंद्रातून मंडळातर्फे जे दर लावावे लागतील ते ग्राहकांना परवडतील काय हे पहावे लागेल. उपाध्यक्षांनी असे मत व्यक्त केले की, त्यांचा सर्वसाधारण अनुभव असा आहे की, लोकांची अपेक्षा ही, योजना लवकर पूर्ण व्हावी, ती चांगल्या रितीने चालावी, त्यांना व्यवस्थितरित्या पाणी मिळावे अशी असते आणि " पाणी द्या व पैसे घ्या " अशी त्यांची वृत्ती असते. तेंव्हा सध्याची कार्यक्रम बाब योग्य असली तरी या प्रकरणी निर्णय केवळ नाईलाज म्हणून न घेता धोरण म्हणून निर्णय घेण्यांत यावा.

अखेर रु. 62.77 कोटी किंमतीची योजना (भांडवलीकरणासह रु. 72.09 कोटी) मंडळाची योजना म्हणून हाती घ्यावयाच्या या प्रस्तावास मान्यता देण्यांत आली व खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यांत आला.

**<u>ठराव :</u>**

यवतमाळ शहरासाठी रु. 3952 लक्ष खर्चाच्या योजनेस सुधारीत प्रशासकीय मंजूरी अद्याप प्राप्त न झाल्याने, तसेच यवतमाळ नगरपरिषदेने, सध्याची योजना पाणी पुरवठा मंडळाच्या मालकीची व ताब्यात असल्याने वाढीव योजना पाणी पुरवठा मंडळाची म्हणून राबवावी अशी मागणी केल्याने, रु. 7209 लाख खर्चाची सुधारित चापडोह उद्भव योजना पाणी पुरवठा मंडळाची योजना म्हणून शासनास सादर करावी व त्यासाठी लागणारे रु. 1061.05 लक्ष इतके कर्ज पाणी पुरवठा मंडळाने उभारावे व त्याची परतफेड पाणी पुरवठा मंडळाने करावी व ही योजना मंडळाने कार्यान्वित करावी व याबाबतचे सर्व अधिकार मा.सदस्य सचिव यांना देण्यांत यावे.

**<u>कार्यक्रम बाब क्र.15</u>** : महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या कांही नागरी पाणी पुरवठा केंद्रातून ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी पाणी पुरवठा करण्यासाठीचे सुधारित दर.

सदस्य सचिवांनी अशी माहिती दिली की, मंडळाच्या काही पाणी पुरवठा केंद्रातून ग्रामीण भागाला पाणी पुरवठा केला जातो. सहाजिकच नागरी पाणी पुरवठयासाठी जे पाण्याचे दर आहेत तेच ग्रामीण भागास लागू केले जातात. मात्र जर या ग्रामीण क्षेत्रासाठी जर स्वतंत्रपणे योजना हाती घेतली असती तर ती 100 टक्के अनुदानाने पूर्ण केली गेली असती. विजेच्या बिलापोटी कमी खर्च व त्यातही अनुदान मिळाले असते व त्या लोकांना कमी दराने पाणी पुरवठा होऊ शकला असता. म्हणून, जरी नागरी पाणी पुरवठा केंद्रातून ग्रामीण भागास सवलतीच्या दराने पाणी पुरविण्यात यावे. मंडळास कमी उत्पन्न मिळणार असलेतरी, पाणी पुरवठयाचे एकूण महसूलातून ही तूट भागविता येण्याजोगी असल्याने हा प्रस्ताव मान्य व्हावा, अशी त्यांनी विनंती केली.

प्रधान सचिवांनी अशी सूचना केली की, वर उल्लेख केलेल्या बाबी ध्यानांत घेता सवलत देण्यास हरकत नाही पण ग्रामीण भागात व्हावयाच्या पाणी पुरवठयावर नियंत्रण ठेवावे लागेल म्हणजे त्या

लोकांना दरडोई 55 लि. पेक्षा जास्त पाणी पुरवण्यांत येऊ नये यासाठी मिटर लावता येईल पण प्रत्यक्षात काय घडू शकेल हे सांगणे कठिण आहे असेही मत व्यक्त केले गेले. अखेरीस असे ठरले की, ग्रामीण जनतेला किरकोळ प्रमाणांत जो पाणी पुरवठा केला जातो त्यासाठीचा दर, कार्यक्रम बाबीत सुचविल्याप्रमाणे, प्रति हजार लिटरला 1.50 पैसे ऐवजी 2 रुपये करावा व जिथे ग्रामपंचायती व जिल्हापरिषदांना घाऊक पाणी पुरवठा होतो तेथे, आधी सुचविल्याप्रमाणे, 1.35 पैसे प्रति हजार लिटर या दराऐवजी 1 रु. 80 पैसे हा दर लागू करावा.

**ठराव :**

मंडळ असा ठराव करीत आहे की, मंडळाच्या नागरी पाणी पुरवठा योजनेतून आजूबाजूच्या खेड्यांना व ग्रामीण जनतेला होणारा पाणी पुरवठा मंडळाच्या नागरी पाणी पुरवठा भागासाठी ठरविलेल्या दराप्रमाणे न आकारता त्यांना खालीलप्रमाणे दर आकारणी करावी.

| | | |
|---|---|---|
| 1) | ग्रामपंचायत व जिल्हापरिषद यांना घाऊक पाणी पुरवठा. | 1.80 प्र.ह.लि. |
| 2) | ग्रामीण जनतेला किरकोळ पाणी पुरवठा. | 2.00 प्र.ह.लि. |

असा ठराव करण्यांत येतो की, ग्रामीण भागासाठी नवीन दर दिनांक 1.6.1996 पासून लागू करावेत.

**कार्यक्रम बाब क्र.16** : महानगरपालिका/नगरपालिकांकडून येणे असलेल्या हमी शुल्क थकबाकी रकमेवर शासन निर्णयाप्रमाणे दंडनिय व्याज आकारणी करणे.

हमी शुल्क थकबाकीवर दंडनीय व्याज आकारण्याची आवश्यकता वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांनी विषद करुन सांगितली. मंडळाकडून शासनाला हमी शुल्क भरण्यांस विलंब झाल्यास शासनाकडून 16 टक्के ते 24 टक्के दंडनीय आकारणी लावली जाते. मात्र ही दंडनीय रक्कम महानगरपाालिका/नगरपालिका (जे हमी शुल्क रक्कम थकवितात) यांच्याकडून वसूल न केल्यास मंडळाला तोटा सहन करावा लागतो, असा आक्षेप महालेखाकार यांनी लेखा परिक्षणामध्ये देखील घेतला आहे. म्हणून हमी शुल्क थकबाकीवर शासनाने ठरविलेल्या दराप्रमाणे दंडनीय आकारणी करणे आवश्यक आहे असे नमूद करण्यांत आले.

दंडनीय व्याजाचा दर शासन हमी शुल्काप्रमाणे ठेवण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही असे ठरले.

**ठराव :**

असा ठराव करण्यांत येतो की, दि. 1.4.1991 पासून मंडळाने उभारलेल्या विविध कर्जावरील हमी शुल्क थकबाकीदार असणा–या महानगरपालिका/नगरपालिकांकडून शासन निर्णय हमी/1090/114/शा , दिनांक 14.11.1990 अन्वये निर्देशित केलेल्या थकीत हमी शुल्कावर पहिल्या तीन महिन्यासाठी 16 टक्के दराने व्याज व पुढील कालावधीसाठी 24 टक्के दंडनीय व्याज आकारण्यास व वसूल करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.17** : महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळ अधिनियम 1979 अन्वये कलम 39 अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांकडील थकबाकी वसूली.

हा प्रस्ताव शासन निर्णय क्र.आरईव्ही–1095/प्र.क्र.18/ल.5, दि. 5.10.1995 अन्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शनपर सूचनेच्या अनुषंगाने सादर करण्यांत आला आहे असे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांनी नमूद केले. या प्रस्तावावर अध्यक्षांनी असे नमूद केले की, दि. 5.10.95 रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचना हया अशा प्रकरणाबाबत व्यावहारिक दृष्टीकोनातून लागु करणे शक्य नसते. त्यामुळे प्रस्तावित संकल्पना यशस्वी होईल असे वाटत नाही. म्हणून अध्यक्षांनी असे सूचविले की, सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांकडील थकबाकी, त्यांना अनुज्ञेय असणा–या असंविधानिक अनुदानातून काही प्रमाणात वसूल केली जातेच व अलिकडे महानगरपालिका/नगरपालिका यांना अनुज्ञेय असलेल्या सांविधानिक अनुदानातून देखील पाणी पुरवठा मंडळाची थकबाकी वसूल करण्यासंबंधी निर्णय घेतला आहे. त्यामुळे त्यांच्यासाठी हया प्रस्तावाची आवश्यकता नाही.

**कार्यक्रम बाब क्र.18** : महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या सदस्य सचिवांसाठी मुंबई येथे मालकी हक्काने घर विकत घेणेबाबत.

मुख्य प्रशासकीय अधिका–यांनी या विषयाची पार्श्वभूमी सांगितली. सदस्य सचिवांना मंत्रालयात वा मा.मंत्री महोदयांकडे चर्चेसाठी किंवा बैठकांसाठी वरचेवर उपस्थित रहावे लागते व त्यादृष्टीने त्यांना मंत्रालयाजवळच निवासस्थान उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. सदस्य सचिवांसाठी शासकीय निवासस्थान मिळविण्याचे प्रयत्न करण्यांत आले. तथापि ते निष्फळ ठरले आहेत. म्हणून सध्या सदस्य सचिवांसाठी वरळी येथे एक निवासस्थान भाडयाने घेण्यांत आले आहे. तथापि ते भविष्यात लवकरच खाली करावे लागणार आहे. तेंव्हा सदस्य सचिवांना इतरत्र पण जवळच एक योग्य निवासस्थान उपलब्ध करुन देणे जरुरीचे आहे. या संदर्भात चर्चेमध्ये मा.अध्यक्षांनी नागरी कमाल धारणेतून उपलब्ध 2 टक्क्यापैकी गाळा देता येईल का अशी विचारणा केली असता मा.उपाध्यक्षांनी याची अजिबात शक्यता नसल्याचे स्पष्ट केले. तेंव्हा चर्चेच्या अंती मा.अध्यक्षांनी असे आदेश दिले की, सदस्य सचिवांसाठी मंत्रालयापासून जवळच महाराष्ट्र गृहनिर्माण विकास प्राधिकरण (म्हाडा) कडून एक निवासस्थान विकत घेण्याचा प्रयत्न करावा व त्या कामी प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी स्वतः म्हाडाकडे आपले स्तरावर प्रयत्न करावा. एक मोठे निवासस्थान उपलब्ध नसल्यास दोन लहान निवासस्थाने एकत्र करुन देता येतील का याचा विचार करावा व तसा प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा.

**कार्यक्रम बाब क्र.19** : मंडळाचे काम त्वरेने व सुलभतेने होण्याच्या दृष्टीने मंडळाला अधिकार प्रदान.

या विषयाची पार्श्वभूमी नमूद करताना मुख्य प्रशासकीय अधिका–यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळातील अधिकारी व कर्मचा–यांना शासनाप्रमाणेच सर्व सेवाविषयक सवलती देणे आवश्यक आहे व तसे आश्वासनही मंडळ स्थापनेच्या वेळी देण्यांत आले होते. तथापि शासनाचे कोणतेही अर्थविषयक आदेश मंडळातील कर्मचा–यांना लागू करताना प्रत्येक वेळी शासनाकडे जावे लागते व त्यामुळे मंडळातील कर्मचा–यांना अशा सवलतींचा लाभ मिळण्यास फार उशीर होतो. त्यामुळे काही बाबतीत शासनाप्रमाणेच आदेश काढण्याचे अधिकार मंडळाला दिले तर प्रत्येक वेळी शासनाकडे जाणे आवश्यक ठरणार नाही या विषयावर सविस्तर चर्चा झाली व सध्या हा विषय पुढे ढकलण्यांत यावा असे ठरविण्यांत आले.

**कार्यक्रम बाब क्र.20** : रद्द करण्यांत आली आहे.

**कार्यक्रम बाब क्र.21** : वैद्यकीय खर्चाची कमाल मर्यादा वाढविणेबाबत.

या विषयाची पार्श्वभूमी मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी विषद केली.. या विषयावर चर्चा करताना सचिव, ग्राम विकास विभाग यांनी असे प्रतिपादन केले की अशी प्रतिपुर्ती करण्यापेक्षा मेडीकेअर वगैरे सारख्या कंपन्यांमार्फत मंडळातील कर्मचा–यांना वैद्यकीय विमा योजना लागू करता येईल किंवा कसे व अशी योजना लागू केल्यास कर्मचा–यांना काय अधीक फायदे मिळतील हे पहावे व त्याबाबत जो हप्ता भरावा लागेल याचा तौलनिक विचार करुन असे हप्ते मंडळाने भरणे शक्य होईल कां, याबाबत विचार करुन पुढील बैठकीत हा विषय पुन्हा ठेवावा, असे आदेश मा. अध्यक्षांनी दिले.

**कार्यक्रम बाब क्र.22** : मंडळांतर्गत राज्य स्तरावर होणा–या क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धामध्ये भाग घेणा–या कर्मचा–यांना स्पर्धेच्या ठिकाणी जाण्याकरिता होणारा प्रवास खर्च व दैनिक भत्ता देणेबाबत.

या विषयाची पार्श्वभूमी मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी नमूद केली व सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यांत आला.

ठराव :

मंडळांतर्गत होणा–या राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धा आयोजित करणा–या यजमान मंडळास (कार्यालयास) किंवा क्रिडा मंडळास, क्रिडा/सांस्कृतिक स्पर्धा आयोजनाकरिता होणा–या खर्चाकरिता स्वतंत्र निधीची तरतूद देऊन राज्यस्तरिय व क्षेत्रिय मंडळ/परिमंडळ स्तरावर होणा–या स्पर्धाकरिता निवड झालेल्या खेळाडूंना स्पर्धेस उपस्थित राहण्याकरिता होणारा प्रवास खर्च भागविण्यासाठी खेळाडू कर्मचारी / अधिकारी यांना दुस–या वर्गाचे रेल्वेभाडे / एस.टी.बसचे भाडे मंजूर करण्यास मंडळ मान्यता देत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.23** : श्री.एल.सी.हेबारे, वरिष्ठ लिपीक यांचे वैद्यकीय देयक.

या प्रकरणाची माहिती मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी विषद केली. मंडळाने श्री.एल.सी. हेबारे यांच्या आई–वडिलांवरील वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करण्याचे " ना मंजूर " केले असल्याने व घेतलेल्या रकमेची वसूली सुरु केली असल्याने मंडळाचे सदस्यांची भेट किंवा मंडळाच्या बैठकीसमोर बाजू मांडण्याची परवानगी मागत असतात. ते वेतन न स्विकारता सतत इतर कर्मचारी – अधिकारी यांच्याविरुध्द तक्रारी करीत असतात असे नमूद केले. या तक्रारींची दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यांत येत आहे. तरीही ते थेट पत्रव्यवहार करतात व असभ्य भाषा वापरतात व आत्मदहनाची धमकी देतात. या विषयावर चर्चा होऊन श्री. हेबारे यांची मागणी नामंजूर करुन त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही कां करु नये अशी कारणे दाखवा नोटीस काढावी व त्यांवर कडक कारवाई करावी असे आदेश मा.अध्यक्षांनी दिले.

**कार्यक्रम बाब क्र.24** : मोरबे धरण प्रकल्पावर काम करणा–या कर्मचा–यांना प्रकल्पावर राहण्याची अट शिथिल करुन " प्रकल्पक्षेत्र " म्हणून घोषित केल्याने प्रकल्प भत्ता देण्याबाबत.

या विषयावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी असे नमुद केले की, हे कर्मचारी प्रकल्प क्षेत्रात राहात नसल्याने त्यांना प्रकल्प भत्ता देणे योग्य होणार नाही, तथापि ते जेथे राहात आहेत तेथील दराने घरभाडे भत्ता व स्थानिक पूरक भत्ता देणे शक्य होईल का याचा विचार करावा. मा.अध्यक्षांनी असे प्रतिपादन केले की, जर मंडळ त्यांना प्रकल्प क्षेत्रात निवासस्थान देऊ शकत नाही व तेथे निवासस्थान उपलब्ध होत नाहीत व त्यामुळे त्यांना प्रकल्प क्षेत्राबाहेर रहाण्याखेरीज

इलाज नाही व म्हणून त्यांना काहीतरी भरपाई देणे आवश्यक आहे व असे सुचविले की, प्रकल्प भत्ता देण्याऐवजी या कर्मचा--यांना अश्या प्रकारचा निवास भत्ता द्यावा मात्र तो सर्वसाधारणपणे कर्मचचा--यांना मिळणा--या घरभाडे भत्त्यापेक्षा जास्त नसावा.

ठराव :

मोरबे धरण प्रकल्प योजनेवर प्रत्यक्ष काम करणा--या कर्मचा--यांना, सदरहू योजना शासन निर्णय दिनांक 4.10.94 अनव्ये " प्रकल्पक्षेत्र " म्हणून घोषित केली असल्याने, त्याचप्रमाणे आता प्रकल्पाधिन क्षेत्रांत नवीन निवासस्थान बांधणे संययुक्तीक नसल्याने, (तसेच कर्मचा--यांना द्यावयाचा 'प्रकल्प भत्ता' निवासस्थानांच्या दुरुस्ती व निगा राखण्याच्या खर्चाकरिता येणा--या खर्चापेक्षा व त्यांनी पूर्वीच्या मुख्यालयांत देण्यांत येणा--या शहर भत्ता व घरभाडे भत्ता हयांच्याकरिता मंडळास होणा--या खर्चापेक्षा अगदीच कमी असल्याने, प्रकल्पावर राहण्याची अट शिथील करुन) या योजनेवर काम करीत असणा--या सर्व अधिकारी/कर्मचा--यांपैकी ज्यांना निवासस्थान उपलब्ध करुन देता येत नाही, त्यांना भरपाई म्हणून निवासस्थान भत्ता सर्वसाधारणपणे कर्मचा--यांना मिळणा--या घरभाडे भत्त्यापेक्षा जास्त नाही असा मंजूर करण्यास मंडळ मान्यता देत आहे. शासनाकडून मान्यता मिळवण्यासाठी सदस्य सचिवांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.25** : श्री.राकेश पटेल यांचे प्रकरण. -- चंद्रपूर पाणी पुरवठा योजना (जि.चंद्रपूर) करिता श्री.राकेश एस.पटेल व इतरांची जमीन म.पा.पु. व ज.नि.मंडळाने पाईप्स ठेवण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात वापरल्याने द्यावयाचे भाडे.

मंडळाचे सदस्य सचिव व मुख्य अभियंता (नागरी) यांनी कार्यक्रम बाबी बद्दल माहिती दिली. जमिनीसाठी महसूल विभागाने अकृषिक दर व दंड आकारु नये. अन्यथा मंडळाला महसूल विभागाने आकारलेला कर व दंड भरावा लागेल व त्याशिवाय काही रक्कम भाडे म्हणून द्यावी लागेल. ही जागा मंडळाचा वापर संपल्यावर परत कृषिक झाली असल्यामुळे भाडे त्याप्रमाणात कमी देणे उचित होईल. मा. अध्यक्ष महोदयांनी अशी सूचना केली की, असा प्रसंग पुनः उद्भवू नये म्हणून काळजी घेणे आवश्यक आहे. चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करणेंत आला.

ठराव :

असा ठराव करण्यांत येतो कि, चंद्रपूर पाणी पुरवठा योजनेसाठी लागणा--या पाईप्सचा केलेला साठा श्री.राकेश पटेल व इतरांच्या जमिनीवर तात्पुरत्या स्वरुपाचा असल्यामुळे व पाणी पुरवठा योजना या जनहितार्थ राबविण्यांत येत असल्यामुळे महसूल विभागाला सदर ठिकाणी लावलेला अकृषिक सारा व दंड याचा पुनर्विचार करुन सदर जमिनीसाठी कृषिक सारा आकारावा अशी विनंती करावी. याबाबत शासनास तसेच महसूल विभागाकडे पत्रव्यवहार करण्याचे अधिकार प्रधान सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांना देण्यांत यावेत. तसेच शासनाने हे न मान्य केल्यास महसूल विभागाने आकारलेला कर व दंड हा मंडळाने सोसावा. श्री.राकेश पटेल यांच्या भाडयाबाबत त्यांचेशी चर्चा करण्याचे अधिकार सदस्य सचिव यांना द्यावेत.

**कार्यक्रम बाब क्र.26** : मध्यवर्ती मंडळ कार्यालयाच्या नियंत्रणाखालील सी.बी.डी. येथील बी--10 प्रकारच्या इमारतीतील सदनिकांना बाल्कनीसाठी वाढीव बांधकामांना मंजूर देणेबाबत.

या विषयाची पार्श्वभूमी मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी नमूद केली. त्यांनी असे नजरेस आणून दिले की, सी.बी.डी., बेलापूर येथे बी--10 प्रकारची 32 निवासस्थाने आहेत. ती वेगवेगळया 12 इमारतींमध्ये विखुरलेली आहेत. या इमारतींचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने पाणी गळती व इतर

प्रकारच्या तक्रारी सतत निवासस्थानांत राहणा–या कर्मचा–यांकडून येत असतात. कर्मचा–यांना वाढीव बांधकामाला मंजूरी दिली तर मंडळाच्या मालकीच्या क्षेत्रफळात काहीशी वाढ होईल व त्यासाठी 32 निवासस्थानांना एकूण रु. 19.20 लक्ष एवढा खर्च होईल. यावर सांगोपांग चर्चा करण्यांत आली असता असे ठरविण्यांत आले की, या निवासस्थानांचे निकृष्ट बांधकाम लक्षात घेता ही निवासस्थाने विकूनच टाकण्यांत यावी व तेथील कर्मचा–यांसाठी मंडळाच्या उपलब्ध जागेतच मंडळाने स्वतःची निवासस्थाने बांधायी. या निर्णयाच्या अनुषंगाने सदर कार्यक्रम बाबीतील प्रस्ताव " नामंजूर " करण्यांत आला.

<u>कार्यक्रम बाब क्र.27</u> : सिंधुदुर्ग जिल्हयाचे मुख्यालय, ओरोस येथे मंडळासाठीच्या आरक्षित भूखंडावर मंडळाचे निधीतून विभागीय कार्यालय व तीन उप विभागीय कार्यालयासाठी इमारत बांधणे.

मंडळाचे मुख्य अभियंता (नागरी) यांनी कार्यक्रम बाबीबद्दल माहिती दिली. सिंधुदुर्ग जिल्हा मुख्यालय ओरोस हे निश्चित झाले असून तेथे सर्व सुविधा निर्माण झाल्या आहेत व काही कार्यालयाचे स्थलांतरही झाले आहे.

जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांनी परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभाग, कणकवली या कार्यालयाची (उपविभागासह) इमारत ओरोस येथे बांधणेसाठी जागेचा प्रत्यक्ष ताबा दिला असल्यामुळे प्रस्तावित कार्यक्रम बाब मंजूर करणेंत आली. तसेच याबाबत चर्चा करताना सचिव, ग्राम विकास व जलसंधारण यांनी अशी सूचना केली की कार्यालयाच्या इमारतीबरोबरच कर्मचा–यांच्या निवासस्थानासाठी सुध्दा इतर खात्याप्रमाणे मंडळाने जिल्हाधिका–यांकडून जागा मिळवावी. यावर मा.अध्यक्ष महोदयांनी वरील बाबीची पूर्तता करुन निवासस्थानाबाबतचा प्रस्तावही पुढच्या बैठकीच्या वेळी घ्यावा अशा सूचना दिल्या. पुढीलप्रमाणे प्रस्तावित बाबीचा ठराव पारित करणेंत आला.

<u>ठराव :</u>

ओरोस या सिंधुदुर्ग जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी मंडळसाठीच्या आरक्षित भूखंडावर विभागीय कार्यालय व तीन उप विभागीय कार्यालयासाठी एकत्रित इमारत बांधण्याच्या प्रस्तावास व त्यासाठी येणा–या रु. 50 लक्ष इतक्या अंदाजित खार्चास या ठरावाद्वारे मान्यता देण्यांत येत आहे. या संपूर्ण प्रकल्पाची वस्तुनिष्ठ सविस्तर अंदाजपत्रके व आराखडे सिडकोच्या अटीनुसार तयार करुन कार्यालयीन इमारत बांधणेसंबंधीची पुढील कार्यवाही करण्यासही मान्यता देणेत येत आहे. या इमारतीसाठी प्रस्तावित रु. 50 लक्ष इतका खर्च किंवा प्रकल्पाचा खर्च वाढल्यास त्याप्रमाणे वाढीव खर्च मंडळाच्या स्वतःच्या निधीतून करण्यासही मान्यता देण्यांत येत आहे. मंडळाच्या निधीतून रक्कम काढण्याचे व खर्च करण्याचे अधिकार या ठरावाद्वारे मंडळाच्या सदस्य सचिवांना देण्यांत येत आहेत.

<u>कार्यक्रम बाब क्र.28</u> : महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या केंद्रीय कार्यालयांतील चतुर्थश्रेणी कर्मचा–यांमधील नाईक/रोनिओ चालक/झेरॉक्स चालक या पदांना विशेष वेतन लागू करणेबाबत.

या विषयाची पार्श्वभूमी मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी विषद केली. चर्चेअंती खालील ठराव मंजूर करण्यांत आला.

<u>ठराव :</u>

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या केंद्रीय कार्यालयाच्या आस्थापनेवर अस्तित्वात असलेल्या वर्ग–4 मधील नाईक, झेरॉक्स चालक व रोनिओ चालकांना दरमहा रु.30/– " विशेष वेतन " लागू करण्यास मंडळ या ठरावाद्वारे मान्यता देत आहे.

शासनाकडून वरील प्रस्तावास मान्यता मिळविण्यासाठी पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार मंडळाचे सदस्य सचिव यांना देण्यांस मंडळ संमती देत आहे..

**कार्यक्रम बाब क्र.29** : कुळगांव पाणी पुरवठा योजना मंडळाने देखभाल करणेबाबत.

मुख्य अभियंता (प्रकल्प) यांनी कार्यक्रम बाब विषद करताना असे नमूद केले की, सध्या मंडळाचे धोरण शक्य तेवढया पाणी पुरवठा योजना स्थाानिक स्वराज्य संस्थांकडे सूपूर्द करण्याचे असल्यामुळे नगरपालिकांच्या पाणी पुरवठा योजना मंडळाकडे देखभाल दुरुस्तीसाठी परत हस्तांतरित करण्याची मागणी ही शासनाच्या/मंडळाच्या धोरणाविरुध्द असल्यामुळे मान्य करु नये. तेव्हा ही योजना देखभाल दुरुस्तीसाठी मंडळाकडे परत न घेण्याचा निर्णय झाला.

ठराव :

या ठरावानुसार महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळ, कुळगांव बदलापूर नगरपालिकेची एरंजाड विभागाची वितरण व्यवस्थेची योजना, देखभाल दुरुस्तीसाठी ताब्यात घेण्याची विनंती अमान्य करीत आहे. तसेच शासनाच्या धोरणानुसार कुळगांव बदलापूर नगरपालिकेने त्यांच्या नगरपालिका क्षेत्रातील, सध्या मंडळ देखभाल करीत असलेली, वितरण व्यवस्थाही मंडळाकडून लवकरात लवकर दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी संबंधित नगरपाालिकेने ताब्यात घेणेबाबत शासनाकडून आदेश मिळविण्यासाठी वरील दोन्ही बाबी शासनाच्या निदर्शनास आणून देण्याबाबत सदस्य सचिवांनी पुढील कार्यवाही करावी.

**कार्यक्रम बाब क्र.30** : महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या आस्थापनेवरील वर्ग–4 कर्मचा–यांना व वाहनचालकांना देण्यांत येणा–या धुलाई भत्त्यात वाढ करणेबाबत.

या विषयाची पार्श्वभूमी मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी नमूद केली. यावेळी मा.अध्यक्षांनी असे आदेश दिले की, एखाद्या विषयाची तांतडी नसल्यास कार्योत्तर मंजुरीच्या अपेक्षेने कार्यवाही होऊ नये व मंडळाची मंजुरी घेतल्यानंतरच असे अर्थविषयक लाभ मंडळ कर्मचा–यांना देण्यांत यावे. चर्चेअंती खालील ठराव मंजूर करण्यांत आला.

ठराव :

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या चतुर्थश्रेणी व वाहनचालकांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक 8.2.1996 ला अधिन राहून पूर्वलक्षी प्रभावाने (दि. 1.4.1995 पासनू) दरमहा रु. 30/– धुलाई भत्ता देण्यास या ठरावाद्वारे कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. तत्संबंधीचे आदेश निर्गमित करण्यास मंडळाचे सदस्य सचिव, यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.31** : पनवेल व माणगांव येथील मंडळाच्या उपलब्ध जागेवर कर्मचारी निवासस्थाने बांधणे.

मंडळाचे मुख्य अभियंता (नागरी) यांनी कामाबद्दल माहिती दिली. चर्चेअंती पनवेल येथे मंडळाच्या उपलब्ध जागेवर निवासस्थान बांधणेचा प्रस्ताव मंजूर झाला. तथापि माणगांव येथील कर्मचारी निवासस्थान बांधणेच्या प्रस्तावाबाबत मा. उपाध्यक्ष महोदयांनी विभागीय कार्यालय, अलिबाग या जिल्हयाच्या

मुख्यालया ठिकाणी ठेवण्याऐवजी माणगांव येथे कां ठेवण्यांत आले अशी विचारणा केली. यावर रायगड जिल्हयात पनवेल येथे एक विभाग कार्यरत असल्यामुळे त्यावेळच्या परिस्थितीनुसार माणगांव येथे विभाग ठेवणेत आला असे सांगण्यांत आले. तथापि सद्यस्थितीत जिल्हा मुख्यालयाला विभागीय कार्यालय असणे गरजेचे असून त्यानुसार आढावा घेऊन नंतर ही कार्यबाब मंजूरीसाठी प्रस्तावित करावी अशा सूचना मा.अध्यक्ष महोदयांनी दिल्या.

पुढीलप्रमाणे पनवेल येथील कर्मचारी निवासस्थान बांधणेचा ठराव पारित करणेंत आला.

ठराव :

पनवेल येथील तक्का भाग म्हणून ओळखल्या जाणा–या जागी पुणे मुंबई रस्त्याला लागून सोईच्या जागी मंडळाच्या मालकीची 7378 चौ.मी. जागा उपलब्ध आहे. या जागेत सध्या एकूण 878 चौ.. मीटरचे बांधकाम असलेल्या पांच इमारती आहेत. या शिवाय या जागेत बरीच मोकळी जागा उपलब्ध असून, तेथे कर्मचारी निवासस्थाने बांधल्यास नवी मुंबई येथे काम करणा–या कर्मचा–यांच्या निवासाची कमी खर्चात सोय होईल व निवासस्थानांचा सध्याचा प्रश्न सुटेल. अधीक्षक अभियंता, परिसर अभियांत्रिकी मंडळ, नवी मुंबई यांनी जागेचा अभ्यास करुन, नगररचना खात्याच्या नियमानुसार, सर्व कायदेशिर बाबींची पुर्तता करुन पुढे नमूद केल्याप्रमाणे कर्मचारी निवासस्थान बांधण्याचे अंदाजपत्रकीय स्वरुपातील प्रस्ताव तयार करावा व त्यास सक्षम अधिका–यांची मंजूरी घ्यावी. या कामासाठी मंडळाच्या 1996–97 च्या अंदाजपत्रकात रु. 10.00 लक्षांची तरतूद करण्यांत यावी. एकूण प्रकल्पाचा खर्च रु. 61.00 लक्ष अपेक्षित आहे.

**कार्यक्रम बाब क्र.32** : महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळातील वसुली कक्ष 92–93 च्या पुढे चालू ठेवणेस मंजूरी मिळणेबाबत.

या विषयाची माहिती मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी दिली. मंडळाची थकबाकी फार मोठया प्रमाणावर आहे व ती पाठपुरावा करुन वसूल करण्यासाठी वसुली कक्षाची आवश्यकता आहे. त्याचा विचार करता खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यांत आला.

ठराव :

वसुली कक्षातील पदांना 1.3.96 च्या पुढे चालू ठेवण्यास मंडळ या ठरावाद्वारे मान्यता देत आहे. शासनाकडून वसूली कक्षातील पदांना 1.3.96 च्या पुढे चालू ठेवणेसाठी मान्तया मिळवण्यासाठी पुढील आवश्यक कार्यवाहीबाबतचे अधिकार मंडळाचे सदस्य सचिव यांना देण्यास मंडळ संमती देत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.33** : महाराष्ट्र राज्याबाहेरील रुग्णालयामधून अति तातडीच्या आजारावर घेण्यांत आलेल्या उपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती.

या विषयावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. कार्यक्रम बाबीमध्ये प्रस्तावित केलेली दोन्ही प्रकरणे नियमानुसार अनुज्ञेय नसल्याने हे दोन्हीही प्रस्ताव " ना मंजूर " करण्यांत आले.

<u>टेबल कार्यक्रम बाब सूची.</u>

<u>कार्यक्रम बाब क्र.1</u> : ब्रिटीश शासन अर्थसहाय्यीत महाराष्ट्र पाणी पुरवठा व स्वच्छता प्रकल्प, जळगांव जिल्हयातील 42 खेडी व नाशिक जिल्हयातील 56 खेडयांच्या योजनेसाठी चाचणी (ग्रुपवाईज कमीशनींग) व दैनंदिन देखभालीच्या (ट्रायल रन) निविदेबाबत.

ब्रिटीश शासन अर्थसहाय्यीत म.पा.पु. व स्वच्छता प्रकल्प, जळगांव जिल्हयातील 42 खेडी व नाशिक जिल्हयातील 56 खेडी योजनेसाठी चाचणी (ग्रुपवाईज कमिशनिंग) व दैनंदिन देखभालीच्या (ट्रयल रन) निविदेबाबत सदस्य सचिव यांनी प्रस्ताव मांडताना असे सांगितले की, जिल्हापरिषदा योजनांच्या चाचणी काळांत आवश्यक तो कर्मचारी लावू शकत नाही. त्यामुळे चाचणीसाठी पुरेसा कर्मचारी उपलब्ध होत नाही. मंडळासहि असा कर्मचारी वर्ग नेमता येत नाही. म्हणून ब्रिटीश शासनानेच, अशाप्रकारच्या निविदा काढाव्यात व ठेकेदारामार्फत अशी चाचणी घेतल्यास 6 महिन्यांचा खर्च ब्रिटीश शासन देईल असे सुचविले आहे. दरम्यानच्या काळात या निविदा स्वीकृतीसाठी ब्रिटीश शासनाची संमतीहि प्राप्त झाली आहे. त्यानंतर खालीलप्रमाणे ठराव संमत झाला.

<u>ठराव :</u>

ओडीओ (ब्रिटीश शासन) प्रकल्पांतर्गत 42 खेडी व 56 खेडी योजनांच्या चाचणी (ग्रुपवाईज कमिशनिंग) व दैनंदिन देखभालीकरिता (ट्रायल रन) खालीलप्रमाणे निविदांना ब्रिटीश शासनाची मान्यता प्राप्त झालेला असल्यामुळे, सदरील निविदा स्वीकृत करण्यास मंडळ मान्यता देत आहे.

| योजना. | कंत्राटदाराचे नांव. | निविदेचे निविदा दराशी आधिक्य. | रक्कम. |
|---|---|---|---|
| 42 खेडी. | श्री.जी.आर.जाधव, जळगांव. | 15 टक्के. | रु. 7,41,060/-- |
| 56 खेडी. | श्री.पी.जी.सुतार, धुळे. | 45 टक्के. | रु.12,94,560/-- |

<u>कार्यक्रम बाब क्र.2</u> : आस्थापना, हत्यारे व सयंत्रे आकारणी वाढविण्याबाबत.

सध्याच्या आस्थापना, हत्यारे व सयंत्रे आकारातून मिळणारे उत्पन्न व होणारा प्रशासकीयय खर्च याचा विचार करता प्रत्येक वर्षी मंडळाला तोटा सहन करावा लागतो, म्हणून सध्याचा ई.टी.पी.दर 17.5 टक्केवरुन 21 टक्के करणे आवश्यक आहे असे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांनी सांगितले.

सध्याचा ई.टी.पी.चा दर (17.5 टक्के) खूपच जास्त आहे त्यामुळे महानगरपालिका/ नगरपालिका यांच्यावर मोठया प्रमाणात बोजा पडत असल्याच्या तक्रारी त्यांच्याकडे येत असल्याचे अध्यक्ष यांनी नमूद केले. मंडळाच्या कार्यभारामध्ये वाढ होणार आहे या दृष्टीने पाऊले उचलली जात आहेत. मंडळाच्या वाढत्या कार्यभाराचा विचार करता सध्याच्या ई.टी.पी.च्या दराने जास्त उत्पन्न मिळू शकते. म्हणून हा प्रस्ताव सध्या पुढे ढकलण्यांत यावा असे ठरले.

**कार्यक्रम बाब क्र.3** : ग्रामीण व नागरी भागात पिण्याच्या पाण्याच्या योजनांबाबत आराखडा तयार करण्यासाठी आरथापित केलेल्या मंत्रिमंडळ उप समितीचा अहवाल –– ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत गुणवत्ता नियंत्रण.

मंडळाच्या दिनांक 28.8.96 रोजी झालेल्या 69 व्या बैठकीत सदर प्रस्तावावर चर्चा करण्यांत आली. ग्रामीण भागांत योजनांचे गुणवत्ता नियंत्रण करण्यासाठी शासनाने दि. 17 सप्टेंबर, 1994 च्या निर्णयाद्वारे एका योजनेसाठी एकच निविदा बोलाविण्यांत यावी व त्यात साहित्य सामुग्रीसह समावेश असावा. याच शासन निर्णयाद्वारे अ.क्र.2 मध्ये " कोणत्याही परिस्थितीत शासनाच्या परवानगी शिवाय कोणत्याही कामाचे तुकडे पाडू नयेत " असे नमूद केले आहे.

याबाबत पंपिंग मशिनरीच्या ठेकेदारांची नोंदणी मंडळाकडे वेगळी करण्यांत येत असून पंपिंग मशिनरीच्या ठेकेदाराची अशी तक्रार होती की, पंपिंग मशिनरीच्या निविदा वेगळया काढण्यांत याव्यांत. या प्रस्तावावर चर्चा करण्यांत येऊन मंत्रिमंडळ उप समितीच्या शिफारशीनुसार व दि. 17 सप्टेंबर, 1994 च्या शासन निर्णयानुसार एका योजनेसाठी एकच निविदा काढण्यांत यावी. त्यात ती निविदा पंपिंग मशिनरी व साहित्य सामुग्रीसह असावी, असा निर्णय सर्वानुमते घेण्यांत आला. पंपिंग मशिनरीच्या ठेकेदारांना सिव्हील कामाच्या कंत्राटदारांबरोबर निविदा भरतांना योग्य तो करारनामा करण्याची अट घालण्यांत ययावी असे ठरले. त्यामुळे प्रस्तावित केलेला ठराव अमान्य करण्यांत आला.

**कार्यक्रम बाब क्र.4** : महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाच्या नियंत्रणाखालील सी..बी.डी..नवी मुंबई येथील बी–10 प्रकारची निवासस्थाने विकणे व सिडकोकडून स्वतंत्र इमारतच खरेदी करणे किंवा मंडळाच्या स्वत:च्या जागेत कर्मचारी निवासस्थाने बांधणेबाबत.

या विषयावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. सी.बी.डी.. बेलापूर येथील बी–10 प्रकरची निवासस्थाने निकृष्ट दर्जाची असल्याने व तेथे रहात असलेले कर्मचारी सतत तक्रारी करीत असल्याने ही निवासस्थाने विकून टाकून पनवेल किंवा अन्य सोयीच्या मंडळाच्या उपलब्ध जागी मंडळ कर्मचा–यांसाठी नवीन निवास्थाने बांधण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यांत आला. मात्र ही निवासस्थाने विकण्याबाबत योग्य तो प्रस्ताव यथावकाश मंडळापुढे सादर करण्यांत यावा. चर्चेअंती खालील ठराव मंजूर करण्यांत आला:

**ठराव :**

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाने सी.बी.डी.. नवी मुंबई येथे शहर व औद्योगिक विकास महामंडळाकडून एक किंवा दोन इमारतीत एकत्रीत निवासस्थाने विकत घेण्यास किंवा मंडळाच्याच नवीन पनवेल अथवा इतर ठिकाणच्या जागेत स्वत:ची 40 निवासस्थाने बांधण्यास मंडळ मान्यता देत आहे. यासाठी येणा–या खर्चास मंडळ या ठरावाद्वारे मान्यता देत आहे. याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यास मंडळ सदस्य सचिवांना प्राधिकृत करीत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.5** : वाहनचालकांना छत्रीऐवजी रेनकोट देणे तसेच छत्र्यांची असलेली 3 वर्षाची कालमर्यादा रेनकोट करिता 5 वर्षापर्यंत वाढविण्याबाबत.

या विषयावर चर्चा करण्यांत आली व खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यांत आला.

ठराव :

(अ) कार्यालयाशी संबंधीत व पाणी पुरवठा केंद्र/योजनेच्या कामाशी संबंधित वाहनचालकांना आता तीन वर्षातून एकदा अनुज्ञेय असलेल्या एक छत्रीऐवजी पाच वर्षातून एकदा रेनकोट (टोपीसह) अधिकृत किंमतीने (रेट कॉन्ट्रक्ट) खरेदी करण्यास व पाच वर्षातून एकदा वाटप करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

(ब) या प्रस्तावास शासनाची मंजुरी घेण्याकरिता सदस्य सचिव, यांना अधिकार देण्यांत येत आहेत.

वरील सर्व कार्यक्रम बाबींवरिल विषय संपल्यानंतर मा. सदस्य सचिव यांनी, मा.ना.श्री. अण्णासाहेब डांगे, अध्यक्ष, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ व मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तसेच मा.श्री. रवींद्र माने, उपाध्यक्ष, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ व राज्यमंत्री, नगर विकास तथा पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे व इतर सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.